# देहू नगरपंचायत कार्यालय ता हवेली.जि. पुणे

Email : vdodehu@gmail.com

जा.क्र आस्था/ ४६०/२०२१-२२ दि. १६/०२/२०२२

## सर्वसाधारण सभा

**नमुना 'अ' (नियम ३ पहा)**

याद्वारे देहू नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा यांच्या अध्यक्षतेखाली देहू नगरपंचायतीची सर्वसाधारण सभा **वार शुक्रवार दिनांक.२५/०२/२०२२ रोजी सकाळी ११:०० वाजता** नगरपंचायत कार्यालयात जोडपत्रात नमूद केलेले कामकाज चालवण्यासाठी बोलवण्यात येत आहे.

**नमूद 'अ' चे जोडपत्र**

**देहू नगरपंचायतीची शुक्रवार दिनांक २५/०२/२०२२ रोजीचे सभेपुढील चालवायचे कामकाज.**

**सभेपुढील विषय .**

१) नवनिर्मित देहू नगरपंचायतीकरिता प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेबाबत.

२) नवनिर्मित देहू नगरपंचायतीकरिता अग्निशामक केंद्र बांधकाम करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी देणेबाबत.

३) नवनिर्मित देहू नगरपंचायत नविन प्रशासकीय इमारती व अग्निशमन करिता सर्व्हे नं. ९७ (शासकीय गायरान) जागा मागणी करणेबाबत.

४) घनकचरा व्यवस्थापना करिता मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सं.न. ९७ (शासकीय गायरान ) मधील जागा मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

५) नवनिर्मित देहू नगरपंचायत पाणी पुरवठा योजने अंतर्गत WTP करिता (पाणी शुद्धीकरण प्रकल्प करिता ) मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सं.न. ९७ (शासकीय गायरान ) मधील जागा मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

६) ग्रामपंचायतीच्या मालकीच्या मालमत्ता देहू नगरपंचायत यांचे नावे करणेबाबत.

७) देहू नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये असणाऱ्या इतर शासकीय विभागाच्या मालमत्ता नगरपंचायतीच्या ताब्यात घेणेबाबत.

८) देहू नगरपंचायत मध्ये भेट देणाऱ्या अतिथी करिता शाल,श्रीफळ, गाथा इ.देवून सत्कार करणे बाबत निर्णय घेणेबाबत.

९) देहू नगरपंचायत हद्दीतील मिळकतीचे चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणे कामी सर्व मिळकतींचा सर्व्हे करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

Scanned with OKEN Scanner

१०) नगरपंचायत कार्यालयीन दैनंदिन कामकाजासाठी लागणारी विविध प्रकारचे लेटर, पॅड, दाखले,नमुने, नोंदवही छपाई करणेबाबत.

११) शासनाच्या आदेशानुसार विविध कर भरणे करिता चार्टर्ड अकौंटंट नेमणेबाबत.

१२) दुहेरी लेखा नोंदी कामी निविदा प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे बाबत.

१३) जगद्गुरु संत श्रेष्ठ तुकाराम महाराज बीज सोहळा कामकाजाचे नियोजन करणे व खर्चास मंजुरी देणेबाबत .

१४) देहू नगरपंचायत हद्दीतील आठवडे बाजार सुरु करून कर आकारणी करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१५) देहू नगरपंचायत हद्दीतील जागांवर तात्पुरती वाहन पार्किंग व्यवस्था करून कंत्राटी पद्धतीने देणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

१६) मा.पोलिस निरीक्षक तळवडे वाहतूक विभाग यांचे पत्र दि.१९/०२/२०२१ च्या नुसार विचार विनिमय करून सम विषम तारखेस पार्किंग व नो पार्किंग बाबत निर्णय घेणे.

१७) विद्युत विभागांतर्गत विद्युत दिवे व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेबाबत निविदा करणेबाबत.

१८) नवनिर्मित नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्या करिता गणवेश व ओळखपत्र तयार करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

१९) परंडवाल चौक येथे ट्राफिक कंट्रोल सिग्नल बसवणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२०) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये तुंबलेले मलनि:सारण वाहिनी ,चेंबर इ.ठिकाणी आवश्यक काम करणेकरित निविदा पद्धतीने जेट मशीन व सक्शन मशीन कंत्राटी पद्धतीने घेणे बाबत.

२१) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये डेंगूजन्य संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्याकरिता वारी/ यात्रा व इतर वेळ आवश्यकतेनुसार डास प्रतिबंधक औषध फवारणी व इतर प्रतिबंधक उपाययोजना करणेबाबत.

२२) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये स्वच्छता विषयी दैनंदिन कामे करण्याकरिता स्वच्छता कर्मचारी यां आवश्यक साधने व वस्तु खरेदी करणेबाबत.

२३) देहू नगरपंचायत करिता स्वतंत्र बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य निश्चित करणेबाबत.

२४) तिर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत देहू नगरपंचायतीच्या संपूर्ण हद्दीमध्ये सुरक्षिततेच्या कारणास्त CCTV कॅमेरे बसविणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२५) बांधकाम विभागामार्फत मागविण्यात आलेल्या निविदांना मंजुरी देणेबाबत.

२६) आस्थापना विभागामार्फत मागविण्यात आलेल्या निविदांना मंजुरी देणेबाबत.

२७) देहू आळंदी रोड मुख्य कमान रंग रंगोटी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

२८) देहू नगरपंचायत स्थापन झाल्यापासून दैनंदिन कामकाज करण्याकरिता केलेल्या विविध निविदांना खर्चास मान्यता मिळणेबाबत.

२९) देहू नगरपंचायत कार्यालयात थोर महापुरुषांची जयंती साजरी करताना आवश्यक प्रतिमा,हार,फुलं आवश्यक वस्तूंची खरेदी करणेबाबत.

Scanned with OKEN Scanner

३०) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये आवश्यकतेनुसार नगरपंचायत फंडातून पिण्याच्या पाण्याची नविन पाईप लाईन टाकणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणेबाबत

३१) स्वच्छ सर्वेक्षण २०२२ च्या कार्यवाही बाबत विचार विनिमय करणे व त्या अंतर्गत आवश्यक असणाऱ्या कामांना मंजुरी देणे.

३२) माझी वसुंधरा अभियान २.० च्या कार्यवाही बाबत विचार विनिमय करणे व त्या अंतर्गत आवश्यक असणाऱ्या कामांना मंजुरी देणे .

३३) घनकचरा व्यवस्थापना करणे करिता तात्पुरत्या स्वरुपात वाहने कंत्राटी पद्धतीने घेणेबाबत.

३४) देहू स्मशानभूमीत अंतिम संस्कार करणे कामी विद्युत दाहिनी / गॅस शवदाहिनी घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३५) शहरातील रहदारीच्या रस्त्यावर जड वाहनास बंदी करणेबाबत.

३६) शहरातील महत्वाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार हायमास्ट दिवे बसविणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३७) देहू नगरपंचायत हद्दीत प्लास्टिक बंदी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

३८) स्वच्छ सर्वेक्षण आणि माझी वसुंधरा अभियान करिता Brand Ambassador नेमणूक करणे बाबत.

३९) रुग्णवाहिका खरेदी कार्योत्तर मान्यता देणे तसेच RTO पासिंग करून घेणे करिता येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे बाबत.

४०) नविन प्रशासकीय इमारत पुजा साहित्य भांडार दुकान गाळे, वैकुंठ गमन मंदिर शेजारी स्थलांतरीत करणे व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.

४१) देहू नगरपंचायतीकरिता अग्निशामक वाहन खरेदी करणे प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

४२) महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नागरोत्थान महाभियान अंतर्गत देहू नगरपंचायत, देहू साठी नविन पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून त्यास शासनाची तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेणेबाबत तांत्रिक सल्लगार नेमणे बाबत.

४३) महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत देहू नगरपंचायत, देहू साठी नवीन पाणी पुरवठा योजनेद्वारे काम करून त्यास शासनाची तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी घेणेबाबत.

४४) उपविभागीय अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्रावर देहू तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील भुयारी गटार योजना हस्तांतरित करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे

४५) आरोग्य विभागामार्फत कचरा संकलन व इतर कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांकरीता डिझेल / पेट्रोल खरेदी करणेबाबत.

४६) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये संपूर्ण पाणी वितरण व्यवस्था शुद्धीकरण, देखभाल दुरुस्ती व साहित्यासह निविदा करणेबाबत.

४७) नवनिर्मित देहू नगरपंचायती करता नविन प्रशासकीय इमारत व अग्निशमन केंद्र बांधकामा करिता आर्किटेक्चर व तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत.

Scanned with OKEN Scanner

४८) देहू नगरपंचायत हद्दीमध्ये मांस-मच्छी विक्री करण्यास व इंद्रायणी नदी पात्रात मासे पकडण्यास बंदी घालणेबाबत.

**सौ.स्मिता चव्हाण**
**नगराध्यक्षा**
**देहू नगरपंचायत देहू**

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

ता. हवेली, जि. पुणे.

# देहू नगरपंचायत मे. सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२ रोजीचे मंजूर ठराव

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२०

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे ...

**विषय क्र. १ :- नवनिर्मित देहू नगरपंचायतीकरिता प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेबाबत.**

ठराव क्र. १ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून देहू नगरपंचायतीची स्थापना सन २०२० मध्ये करण्यात आलेली आहे. नवनिर्मित देहू नगरपंचायतीची स्थापना झाल्यापासून शासनाकडुन नागरिकांना सोयी सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून विविध महत्वपुर्ण कामांची जबाबदारी देण्यात आलेली आहे. देहू नगरपंचायत हद्दीत नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा देण्यासाठी देहू नगरपंचायतीची मुख्य प्रशासकीय इमारत नसल्याने नागरिकांना सोयी सुविधा प्रदान करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे नगरपंचायत हद्दीत देहू नगरपंचायतीकरिता इमारत प्रस्तावित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने देहू नगरपंचायतीच्या प्रस्तावित प्रशासकीय इमारतीच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मंजूरी घेणे, प्रस्तावित नगरपंचायत इमारतीच्या बांधकामाच्या आराखड्यांना मंजूरी घेणे व देहू नगरपंचायतीच्या नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता मिळणेसाठी शासनास प्रस्ताव सादर करणेकामी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश काळोखे

अनुमोदक - योगेश परंडवाल

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत (stamp)

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे ...

विषय क्र. २ :- **नवनिर्मित देहू नगरपंचायतीकरिता अग्निशामक केंद्र बांधकाम करण्यास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देणेबाबत.**

ठराव क्र. २ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून देहू नगरपंचायतीची स्थापना सन २०२० मध्ये करण्यात आलेली आहे. देहू नगरपंचायतीकडे अग्निशामक केंद्र अग्निशामक वाहन नसल्याने नागरिकांना आपत्कालीन परिस्थीतीत सोयी प्रदान करणे शक्य होत नाही. त्यामुळे देहू नगरपंचायतीकडे अग्निशामक केंद्र व अग्निशामक वाहन असणे अत्यावश्यक आहे. देहू नगरपंचायतीच्या नवीन प्रस्तावित प्रशासकीय इमारतीमध्ये अग्निशामक केंद्राकरीता जागा राखीव ठेवणे आवश्यक असून तसे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने देहू नगरपंचायतीच्या नवीन प्रस्तावित प्रशासकीय इमारतीमध्ये अग्निशामक केंद्राकरिता जागा राखीव ठेवणे, सदर कामाचे अंदाजपत्रक व आराखडे तयार करणे व त्यास तांत्रिक मंजूरी घेणे व शासनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करणे याकामी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रविण काळोखे

अनुमोदक - आदित्य टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे ...

**विषय क्र. ३ :- नवनिर्मित देहू नगरपंचायत नवीन प्रशासकीय इमारत व अग्निशामक केंद्राकरिता सर्व्हे क्र. ९७ (शासकीय गायरान) जागा मागणी करणे.**

ठराव क्र. ३ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून देहू नगरपंचायतीची स्थापना सन २०२० मध्ये करण्यात आलेली आहे. नवनिर्मित देहू नगरपंचायतीची स्थापना झाल्यापासून शासनाकडुन नागरिकांना सोयी सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून विविध महत्वपुर्ण कामांची जबाबदारी देण्यात आलेली आहे. देहू नगरपंचायत हद्दीत नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा देण्यासाठी देहू नगरपंचायतीची मुख्य प्रशासकीय इमारत नसल्याने नागरिकांना सोयी सुविधा प्रदान करणे अडचणीचे ठरत आहे. त्यामुळे नगरपंचायत हद्दीत देहू नगरपंचायतीकरिता इमारत प्रस्तावित करणे आवश्यक आहे. याकरीता देहू नगरपंचायत हद्दीत सर्व्हे क्र. ९७ येथील गायरान जागेत नवीन प्रशासकीय इमारतीकरिता व अग्निशामक केंद्राकरीता अंदाजे ५ एकर जागेची आवश्यकता आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचे तांत्रिक सल्लागार व देहू नगरपंचायत यांच्या समवेत संयुक्त स्थळ पाहणी दरम्यान सर्व्हे क्र. ९७ येथील गायरान जागेत नवीन प्रशासकीय इमारतीकरिता व अग्निशामक केंद्र इमारतीचे बांधकाम करणेस योग्य असल्याच्या असल्याच्या सुचना दिलेल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना मुलभूत सोयी सुविधा देण्याच्या अनुषंगाने सर्व्हे क्र. ९७ येथील गायरान जागेत नवीन प्रशासकीय इमारतीकरिता व अग्निशामक केंद्राकरीता एकुण ५ एकर जागा मिळण्यासाठी सर्व प्रकारची वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास प्रशासकीस व वित्तीय मंजूरीसाठी प्रस्ताव सादर करणेकामी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - रसिका स्वप्नील काळोखे

अनुमोदक - सुधीर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे ...

**विषय क्र. ४ :- घनकचरा व्यवस्थापनाकरीता मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे स.नं. ९७ (शासकीय गायरान) मधील जागा मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेबाबत.**

ठराव क्र. ४ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून देहू नगरपंचायतीची स्थापना सन २०२० मध्ये करण्यात आलेली आहे. नवनिर्मित देहू नगरपंचायतीची स्थापना झाल्यापासून शासनाकडुन नागरिकांना सोयी सुविधा देण्याच्या दृष्टिकोनातून घनकचरा व्यवस्थापन सुधारीत नियम २०१६ अंतर्गत शहरातील निर्माण होणा-या कच-यांचे संकलन व कचरा विलगीकरण करण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आलेली आहे. देहू शहरात निर्माण होणारा कचरा संकलन करुन कच-यावर प्रक्रिया करणेकामी देहू नगरपंचायतीच्या विकास आराखड्यामध्ये घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरीता जागा उपलब्ध नाही.

देहू शहर हे तीर्थक्षेत्र असल्याने लाखोच्या संख्येने भाविक भक्त या ठिकाणी येत असतात. त्यामुळे शहरात निर्माण होणा-या लाखो टन कच-याची विल्हेवाट लावणे आवश्यक आहे. याकरीता देहू नगरपंचायत हद्दीत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरीता अंदाजे ५ एकर इतक्या जागेची आवश्यकता आहे. देहू नगरपंचायत हद्दीत स.नं. ९७ मध्ये गायरान जागेची तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचे तांत्रिक सल्लागार व देहू नगरपंचायत यांच्या संयुक्त स्थळ पाहणी दरम्यान सदरची जागा घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरिता योग्य असल्याच्या सुचना केल्या आहेत. त्याअनुषंगाने देहू नगरपंचायत हद्दीतील स.नं. ९७ या ठिकाणी असलेल्या गायरान जागेत घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाकरीता अंदाजे ५ एकर जागा मिळण्यासाठी मा. जिल्हाधिकारी साहेब, जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणे या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - आदित्य चिंतामण टिळेकर

अनुमोदक - मयूर दत्तात्रय शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे ....

विषय क्र. ५ :- **नवनिर्मित देहू नगरपंचायत पाणी पुरवठा योजनेअंतर्गत WTP करिता (पाणी शुद्धीकरण प्रकल्पाकरिता) मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे स.नं. १७ (शासकीय गायरान) मधील जागा मागणी प्रस्ताव सादर करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

ठराव क्र. ५ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत पाणी पुरवठा शुद्धीकरण प्रकल्प WTP करिता पुरेशी जागा उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या पाणी पुरवठा शुद्धीकरण प्रकल्पामधुन शुद्ध पिण्याचा पुरवठा वितरीत करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून देहू नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये माळीनगर, विठ्ठलनगर या भागाचा समावेश करण्यात आलेला आहे. तसेच देहू शहर हे तीर्थक्षेत्र असल्याने येणा-या भाविकांची संख्या सुद्धा मोठ्या प्रमाणात आहे. त्यामुळे भविष्यात सदर भागात व यात्रा कालावधीमध्ये पुरेशा दाबाने पिण्याचे पाणी वितरीत करण्यास अडचणी येण्याची दाट शक्यता आहे. त्याअनुषंगाने देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व भागामध्ये पुरेशा प्रमाणात व जास्त दाबाने पिण्याचे पाणी वितरीत करणेकरीता नवीन पाणी पुरवठा शुद्धीकरण प्रकल्पाचे काम करणे आवश्यक आहे. देहू नगरपंचायत हद्दीत स.नं. १७ मध्ये गारायन जागेत पुरेशी जागा उपलब्ध असून सदर प्रकल्पाकरीता अंदाजे ५ एकर इतक्या जागेची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने देहू नगरपंचातीसाठी नवीन पाणी पुरवठा शुद्धीकरण प्रकल्प WTP चे प्रस्तावित कामाकरिता स.नं. १७ मधील गायरान जागेतील अंदाजे ५ एकर जागेची मागणी करण्यासाठी मा. जिल्हाधिकारी, पुणे यांना प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेस या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक - स्वोनी गोविंद टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. ६ :- ग्रामपंचायतीच्या मालकीच्या मालमत्ता देहू नगरपंचायत यांचे नावे करणेबाबत.**

**ठराव क्र. ६ :-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. महाराष्ट्र शासनामार्फत देहू नगरपंचायतीची स्थापणा दि. ८/१२/२०२० रोजी करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ च्या तरतुदी नगरपंचायतीस लागु झाल्या आहेत. त्यामुळे देहू ग्रामपंचायत मधील सर्व मालमत्ता देहू नगरपंचायतीमध्ये हस्तांतरित करणे आवश्यक आहे. नगरपंचायातीमध्ये रुपांतर झालेले आहे. ग्रामपंचायत असताना ग्रामपंचायत मालकीच्या ज्या मालमत्ता होत्या त्या सर्व मालमत्ता ह्या नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायतीच्या नावे करण्यात याव्यात अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सुचक** :- पुनम विशाल काळोखे

**अनुमोदक** :- पौर्णिमा विशाल परदेशी

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं.७ :- देहू नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये असणाऱ्या इतर शासकीय विभागाच्या मालमत्ता नगरपंचायतीच्या ताब्यात घेणेबाबत.**

ठराव ७ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतीच्या हद्दीमध्ये जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या मालकीच्या जागा आहे. देहू ग्रामपंचायतीचे शासन आदेशानुसार ८/१२/२०२० रोजी देहू नगरपंचायातीमध्ये रुपांतर झालेले असुन जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या मालकीच्या जागेवर कामे करताना नगरपंचायतीस अडचणी येत आहेत. तेव्हा सदर इतर सर्व शासकीय विभागाच्या मालमत्ता देहू नगरपंचायातीच्या ताब्यात घेतल्यास त्याठिकाणी काही कामे व दुरुस्ती करताना अडचणी येणार नाही. अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- स्वप्ना नरेंद्र मोरे

अनुमोदक :- ज्योती गोविंद टिळेकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. ८:- देहू नगरपंचायत मध्ये भेट देणाऱ्या अतिथी करिता शाल, श्रीफळ, गाथा इ. देवून सत्कार करणे बाबत निर्णय घेणेबाबत.**

**ठराव क्र. ८** :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हे तीर्थक्षेत्र असून या ठिकाणी संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांची समाधी असून दर्शनासाठी महाराष्ट्रातील अनेक मान्यवर, वरिष्ठ अधिकारी, महाराष्ट्राचे सन्माननीय मंत्री येत असतात. याचबरोबर मान्यवर व वरिष्ठ अधिकारी देहू नगरपंचायतीस भेट देत असतात. त्यामुळे मान्यवर व वरिष्ठ अधिकारी यांनी देहू नगरपंचायत कार्यालयास भेट दिल्यास शाल, श्रीफळ व गाथा देवून त्यांचा सत्कार करण्यात येतो. त्यामुळे शाल, श्रीफळ व गाथा इत्यादी साहित्य खरेदी करणेकरीता निविदा प्रक्रिया करणेस व याकामी होणा-या खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक** :- मिना राहुल कन्हेरे

**अनुमोदक** :- पुजा अमोल दिवटे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

विषय नं. ९ :- देहू नगरपंचायत हद्दीतील मिळकतींचे चतुर्थ वार्षिक कर आकारणी करणेकामी सर्व मिळकतींचा सर्व्हे करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ९ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हि नवनिर्मित नगरपंचायत असून तीची स्थापणा सन २०२० मध्ये करण्यात आलेली आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थाचे मालमत्ता कर आकारणीमध्ये सुसुत्रता आणणे, भांडवली मुल्यावर कराची आकारणी करणे, त्याचे मुळ दर (Base Rate) निश्चित करणे इत्यादी बाबी शासनाच्या विचाराधीन आहे. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १०५ ते ११४ दरम्यान अंतर्भूत केलेल्या तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी करणे हा नगरपंचायतीच्या उत्पंन्नाचा प्रमुख स्त्रोत आहे. मालमत्ता कराची सोप्या आणि पारदर्शक पद्धतीने आकारणी करणे आणि प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये मालमत्तेची वसुली करणे ही नगरपंचायतीची मुख्य जबाबदारी आहे. त्याअनुषंगाने देहू नगरपंचायत हद्दीतील सर्व मालमत्तांची शासनाच्या निर्देशाप्रमाणे बेसरेट निश्चित करुन कर आकारणी करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया करणे व पुढील सर्व उचित कार्यवाही करणेसाठी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- पुजा सुनित काळोखे

अनुमोदक :- शितल अनिल हगवणे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. १०:-** **नगरपंचायत कार्यालयीन दैनंदिन कामकाजासाठी लागणारी विविध प्रकारचे लेटर, पॅड, दाखले, नमुने, नोंदवही छपाई करणेबाबत.**

**ठराव क्र. १०:-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हि नवनिर्मित नगरपंचायत आहे. नगरपंचायतीची सार्वत्रिक निवडणूक सन २०२१ आत्ताच पार पडली असुन नगराध्यक्ष , उपनगराध्यक्ष, नगरसेवक यांना दैनंदिन दाखले देण्यासाठी त्यांच्या नावाचे लेटर पॅड नगरपंचायतीमार्फत विविध प्रकारचे दाखले दिले जातात त्याचे नमुने घर नोंदणी फॉर्म, वारस नोंदी फॉर्म, नोटीस तसेच आवक जावक रजिस्टर, जन्म मृत्यू रजिस्टर, स्टोक रजिस्टर व नगरपंचायतीच्या अनुषंगाने लागणारे इतर प्रकारचे रजिस्टर व वेळोवेळी लागणारे दाखले यांची छपाई करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता आवश्यकतेनुसार प्रक्रिया करुन सदर छपाई साहित्य खरेदी करणेस या ठरावान्वये सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक :- सौ.पूजा अमोल दिवटे

अनुमोदक :- सौ.प्रियांका अभिजित मोरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत स्थापना सन २०२० ता. हवेली, जि. पुणे

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. ११ :-** **शासनाच्या आदेशानुसार विविध कर भरणेकरीता चार्टर्ड अकौंटट नेमणे बाबत.**

**ठराव क्र. ११ :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवीन नगरपंचायत असून नगरपंचायतीची स्थापणा सन २०२० या कालावधीमध्ये झालेली आहे. त्यामुळे शासनाच्या निर्देशाप्रमाणे चालु व पुढील येणा-या वर्षातील सर्व प्रकारचे अनुज्ञेय असणारे करासंदर्भातील कामे करणे आवश्यक असल्याने करार पद्धतीने टॅक्स कन्सटंटची नेमणूक करणे आवश्यक आहे. याकरीता निविदा प्रक्रिया करणेस व होणा-या खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- प्रियंका अभिजित मोरे

**अनुमोदक** :- मिना राहुल कुऱ्हाडे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. १२ :-** **दुहेरी लेखा नोंदी कामी निविदा प्रकिसेय प्रशासकीस व वित्तीय मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. १ :-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवीन नगरपंचायत असून नगरपंचायतीची स्थापणा सन २०२० या कालावधीमध्ये झालेली आहे. त्यामुळे शासनाच्या निर्देशाप्रमाणे चालु व पुढील येणा-या वर्षातील सर्व प्रकारचे अनुज्ञेय असणारे करासंदर्भातील दुहेरी लेखा नोंदीचे कामे करणे आवश्यक असल्याने करार पद्धतीने सनदी लेखापालाची नेमणूक करणे आवश्यक आहे. याकरीता निविदा प्रक्रिया करणेस व होणा-या खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- पुजा सुमित काळोखे

अनुमोदक :- पोर्णिमा विशाल परदेशी

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय क्र.१३ :- जगद्गुरू संत श्रेष्ठ तुकाराम महाराज बीज सोहळा कामकाजाचे नियोजन करणे व खर्चास मंजुरी देणेबाबत.**

ठराव क्र. १३ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यातआला. जगद्गुरू संत श्रेष्ठ तुकाराम महाराज बीज सोहळा वैकुंठ गमन सोहळा म्हणजे बीज सोहळा दि. २०/०३/२०२२ रोजी संपन्न होत आहे. या दरम्यान महाराष्ट्रातून लाखोच्या संख्येने भाविक भक्त दर्शनासाठी देहू शहरात दाखल होत असतात. त्यामुळे भाविकांना व वारक-यांना देहू नगरपंचायतीच्या वतीने सोवी सुविधा देणे आवश्यक आहे. याकरीता पुर्व तयारी म्हणून देहू शहरातील मुख्य परिसरातील संपूर्ण साफ सफाई करणे, औषध फवारणी करणे, धूर फवारणी करणे, मुख्य मंदिर परिसरातील व वैकुंठ गमण मंदिर येथील संपूर्ण परिसरातील स्वच्छता करण्यात यावी. इंद्रायणी नदी घाट परिसर साफसफाई करण्यात यावी. येणाऱ्या वारकऱ्याना स्वच्छ पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेकामी TCL, क्लोरीन गॅस, मेडीक्लोअर व इतर आवश्यक रसायने साहित्य खरेदी करून मुबलक साठा ठेवण्यात यावा. बंद पडलेल्या व नादुरुस्त असलेल्या स्ट्रीट लाईट दुरुस्त करून घेण्यात याव्यात. व इतर अनुषंगीक सर्व कार्यवाही पुर्ण करण्यात यावी याकामी निविदा प्रक्रिया करणे व होणाऱ्या खर्चास या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- स्वप्ना नरेश मोरे

**अनुमोदक** :-
पूनम विशाल काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.१४:- देहू नगरपंचायत हद्दीतील आठवडे बाजार सुरु करून कर आकारणी करणे बाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

ठराव क्र. १४ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.कोरोणा विषाणूच्या प्रादुर्भावामुळे शासनाने काही निर्बंध घातले होते. त्या निर्बंधामध्ये प्रत्येक गावात सुरु असलेले आठवडे बाजार बंद करण्यात आले होते, सद्यस्थितीत कोरोनाचा प्रादुर्भाव कमी होऊ लागल्याने शासनाने घातलेले निर्बंध क्षीतील करण्यात आले असुन मोठ्या शहरातील बंद केलेले आठवडे बाजार पुन्हा चालू करण्यात आलेले आहेत.

ग्रामपंचायत असताना आठवड्यातून दोन दिवस म्हणजे मंगळवार व शुक्रवार या दिवशी बाजार भरवले जात होते कोव्हीड -१९ मुळे बाजार बंद करण्यात आले होते. त्या काळात भाजी विक्रते गावातील मेन चौकात व इतरत्र रोडच्या कडेला बसत असल्यामुळे गर्दीचे प्रमाण वाढत होते. त्यामुळे बरेच वेळा ट्राफिक जाम व छोटे मोठे अक्सीडट होत होते तेव्हा ग्रामपंचायत मार्फत आव्हान करण्यात आले कि, जे कोणी भाजीमंडई साठी आपली जागा देईल तेथे भाजी विक्रेत्यांना बसवण्यात येईल गावातील दोन जागा मालकांनी भाजी मंडई साठी जागा देण्यासाठी तयारी दाखवली व त्यांनी त्या ठिकाणी भाजी विक्रत्यासाठी शेड उभारले आहेत व तेथे भाजी विक्रत्याना बसवण्यात आले. त्या दरम्यान देहू ग्रामपंचायतीचे शासन आदेशान्वये देहू नगरपंचायत मध्ये रुपांतर झाले नगरपंचायतीने दोन्ही भाजीमंडई मालकांना भाजीमंडई भरवण्याची परवानगी दिली. त्यापैकी एक भाजीमंडई दररोज भरत असुन एक भाजीमंडई मंगळवार व शुक्रवार असे दोन दिवस मंडई भरत असुन त्याठिकाणी एक प्रकारे बाजाराचे स्वरूप प्राप्त झाले आहे.परवानगी दिलेल्या भाजीमंडई पासून नगरपंचायतीला कोणत्याही प्रकारचे आर्थिक उत्पन्न नाही.

पूर्वी आठवडे बाजाराचा लिलाव होऊन ग्रामपंचायतीला वार्षिक ९ ते १० लाख रुपये मिळत होते. सध्या कोव्हीड -१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्याने ठिकठिकाणचे आठवडे बाजार सुरु झाल्याने नागरिकांच्या मागणीस्तव

Scanned with OKEN Scanner

नगरपंचायतीने आठवडेबाजार पुन्हा सुरु करावा जेणेकरून नवनिर्मित नगरपंचायतीचे आर्थिक उत्पन्न वाढेल. आठवडे बाजारासाठी मोकळी जागा/पटांगण नसल्यामुळे पूर्वी बाजार हा गावातील अंतर्गत मुख्य रस्त्यावर म्हणजेच गावठाणातच भरत होता.

आठवडे बाजार भरविण्याकरिता मोठ्या प्रमाणात बाजार बसेल इतकी मोकळी जागा नगरपंचायतीकडे उपलब्ध नाही. आठवडे बाजार पुन्हा सुरु करणे बाबत चर्चा केली असता आठवडे बाजार हा एक दिवस तरी गावात भरवण्यात यावा जेणेकरून शहरातील स्थानिक गृहिणी,महिला बचत गट, छोटे – मोठे व्यवसाईक, दुकानदार, फेरीवाले यांना रोजगार मिळेल असे मत सौ.सपना मोरे,सौ. प्रियंका मोरे व सौ.पोर्णिमा परदेशी या नगरसेविकांनी मांडले. तर दोन भाजी मंडईनां परवानगी दिलेली असल्यामुळे खाजगी जागेत तसेच दोन दिवस नगरपंचायतीच्या जागेत (पूर्वी प्रमाणे गावठाणात) भरवण्यात यावा जेणेकरून नगरपंचायतीचे उत्पन्न वाढेल असे मत सौ.पूजा काळोखे यांनी मांडले. तसेच बाजारासाठी गावठाणात जागा उपलब्ध होत नसेल तर सरकारी गायरानातील मोकळ्या जागेत बाजार भरवण्यात यावा असे मत श्री.योगेश काळोखे यांनी मांडले.तर परवानगी दिलेल्या दोन्ही भाजीमंडई मालकांनी मंडई उभारण्यासाठी खूप खर्च केलेला आहे तेव्हा त्याचाही विचार करण्यात यावा असे मत श्री. योगेश परंडवाल यांनी मांडले

बाजार भरवण्यासंदर्भात एक मत न झाल्याने व कोणताही ठोस निर्णय न झाल्याने बाजार कोठे भरवण्यात यावा या विषयी पुढील मिटिंग मध्ये चर्चा करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करणायत आला

**सुचक** :- योगेश बाळासाहेब परंडवाल

**अनुमोदक** :- प्रविण रामदास काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. १५:- देहू नगरपंचायत हद्दीतील जागांवर तात्पुरती वाहन पार्किंग व्यवस्था करुन कंत्राटी पद्धतीने देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

**ठराव १५ :-** सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तिर्थक्षेत्र असल्याने हजारो भाविक भक्त हे दररोज दर्शनासाठी येत असतात. पार्किंग व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी नगरपंचायत हद्दीतील असणाऱ्या मोकळ्या जागांवर तात्पुरत्या स्वरुपात पे ॲन्ड पार्किंग व्यवस्था करून ते कंत्राटी पद्धतीने चालविल्यास नगरपंचायतीच्या आर्थिक उत्पन्नात भर पडेल याकरीत ई-लिलाव निविदा प्रक्रिया करुन जास्तीत जास्त बोली लावणा-या कंत्राटदारास वाहनतळ वसुली करण्याचे कार्यादेश देण्यात यावेत. याकामी ई-लिलाव निविदा प्रक्रिया पुर्ण करुन पुढील कार्यवाही करणेकामी या ठरावान्वये सर्वानुमते मंजूर देण्यात येत आहे.

**सुचक** :- प्रविण रामदास काळोखे

**अनुमोदक** :- सुधीर सुरेश काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय १६ :- मा. पोलिस आयुक्त यांचे पत्र दि. १९/०२/२०२१ च्या नुसार विचार विनिमय करून सम विषम तारखेस पार्किंग व नो पार्किंग बाबत निर्णय घेणे.**

**ठराव १६:-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला मा. पोलिस आयुक्त यांचे पत्र जा. क्र. पो. नि. १७१/२०२१ दि. १९/०२/२०२१सम विषम तारखेस पार्किंग व नो पार्किंग बाबत प्राप्त पत्राचे वाचन करण्यात आले शहरातील वाढती गर्दी व वर्षातून येणाऱ्या तीन मोठ्या यात्रा तसेच महिन्यातून येणाऱ्या दोन एकादशी या सर्वांचा विचार करता कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने तसेच अपघात टाळण्याच्या दृष्टीने विचार करणे आवश्यक आहे. तरी मुख्य मंदिर, महाद्वार चौक ते चौदा टाळकरी कमान पर्यंतचा परिसर तसेच तालिम (ग्रामपंचायत कार्यालय) ते शिवाजी चौकचा परिसर हा नो पार्किंग झोन घोषित करावे तसेच नं. प. कार्यालय ते शिवाजी चौक नो पार्किंग करावे, शिवाजी चौक येथे असलेले नं. प. चे कार्यालय आता नविन जागेत शिफ्ट होत असल्याने वाहनाची वर्दळ कमी होणार आहे. त्याठिकाणी सम -विषम तारखेचे पार्किंग व्यवस्था करण्यात यावी व तसे बोर्ड लावावे. पार्किंग व्यवस्था करताना त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची दुकाने लाऊ नयेत. याची दक्षता घेण्यात यावी.

मुख्य महाप्रवेशद्वार ते आंबेडकर चौक या देहू देहूरोड रस्त्यावर सम विषम तारखेची पार्किंग व्यवस्था करण्यात यावी जेणेकरून रस्त्यावर वाहनाची दुतर्फा गर्दी होणार नाही यासाठी ज्याठिकाणी नो पार्किंग आहे त्या ठिकाणी नो पार्किंग व ज्या ठिकाणी सं विषम तारखेचे पार्किंग आहे त्या ठिकाणी सम व विषम तारखेचे बोर्ड लावण्यात यावेत यासाठी पोलिसांचे मार्गदर्शन घेवून निविदा प्रक्रिया करण्यात यावी याकरीता या ठरावान्वये सर्वानुमते वित्तीय व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- मयूर दत्तात्रय शिवशरण

**अनुमोदक** :- आदित्य चिंतामण टिळेकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. १७:- विद्युत विभागाअंतर्गत विद्युत दिवे व इतर अनुषंगीक साहित्य पुरवठा करणेबाबत निविदा करणेबाबत.**

**ठराव क्र. १७:-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तीर्थक्षेत्र असल्याने या ठिकाणी वर्षातून तीन मोठ्या यात्रा भरत असतात. या दरम्यान मोठ्या संख्येने भाविक भक्त देहू शहरात दाखल होत असतात. त्यामुळे भाविकांना सोयी सुविधा देण्याच्या दृष्टिने शहरात सर्व प्रभागात विद्युत रोशनाई करणे आवश्यक असते. तसेच इतरही नादुरुस्ती असलेले विद्युत दिवे व साहित्य खरेदी करावे लागत असते. याअनुषंगाने विद्युत दिवे व विद्युत साहित्य पुरवठा करणेकामी निविदा प्रक्रिया करणेस व होणा-या खर्चास या ठरावन्वये सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- योगेश हनुमंत काळोखे

**अनुमोदक** :- प्रियंका अभिजीत मोरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय क्र. १८ :- नवनिर्मित नगरपंचायतीच्या कर्मचाऱ्या करिता गणवेश व ओळखपत्र तयार करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव क्र. १८ :-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हि नवनिर्मित नगरपंचायत आहे नगरपंचायतीचे जे कर्मचारी आहेत त्यांना गणवेश असणे आवश्यक आहे. तेव्हा विभागानुसार प्रत्येकाला गणवेश असवा जेणेकरून तो कर्मचारी कोणत्या विभागाचा आहे हे ओळखणे सोपे होईल सर्व कर्मचाऱ्याना चांगल्या दर्जाचा गणवेश देण्यात यावा तसेच प्रत्येक कर्मचाऱ्याचे एक ओळखपत्र बनवण्यात यावे त्यावर त्याचे नाव, पद, मोबाईल नंबर तसेच कर्मचारी फोटो असलेले ओळखपत्र बनवण्यात यावे त्यामुळे सदरची व्यक्ती हि नगरपंचायतीचा कर्मचारी आहे याची ओळख राहील. ओळखपत्र चागंल्या व आकर्षक स्वरुपात बनविण्यात यावे सर्व कर्मचारी यांनी कार्यालयात ओळखपत्र व गणवेश परिधान करणे आवश्यक आहे. याकरीता साहित्य खरेदी करणेकामी निविदा प्रक्रिया करणे व होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवून ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सुचक** :- रसिका स्वप्नील काळोखे

**अनुमोदक** :- पूनम विशाल काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय क्र. १९ - परंडवाल चौक येथे ट्राफिक कंट्रोल सिग्नल बसवणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.**

ठराव क्र. १९ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे येथे दररोज हजारो भाविक- देवदर्शनासाठी स्वताची वाहने घेऊन येत असतात. तसेच नगरपंचायत हद्दीलगत असणाऱ्या MIDC, आय टी पार्क या ठिकाणी कामगार वर्गाच्या वाहनामुळे रस्त्यावर वाहनाची संख्या जास्त आहे. तसेच बह्यावळण रस्ता खंडेलवाल चौक ते परंडवाल चौक व पुढे येलवाडी कडे जाणारा रस्ता या रस्त्यावर सुद्धा सर्वात जास्त वाहनाची वर्दळ असुन कायम वाहतूक कोंडी होत आहे. परंडवाल चौक हे शहरातील मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे या चौकातून गावात येणारी वाहने व गावातून बाहेर जाणारी वाहने व इतर जड वाहनामुळे परंडवाल चौकामध्ये दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असते. त्यामुळे वाहतूक सुरळीत करण्यासाठी परंडवाल चौकात ट्राफिक कंट्रोल सिग्नल बसविणे आवश्यक आहे. याकरीता मा. वाहतूक पोलिस निरीक्षक तळवडे विभाग यांच्याशी पत्र व्यवहार करुन ट्राफिक कंट्रोल सिग्नल लावण्यात यावा यासाठी होणाऱ्या सर्व खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून या ठरावान्वये मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- योगेश बाळासाहेब परंडवाल

**अनुमोदक** :- ज्योती गोविंद टिळेकर

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. २०:-** **देहू नगरपंचायत हद्दीमध्ये तुंबलेले मलनिसारण वाहिनी, चेंबर इ. ठिकाणी आवश्यक कामे करणेकरीता निविदा पद्धतीने जेट मशिन व सक्शन मशिन कंत्राटी पद्धतीने घेणेबाबत.**

**ठराव क्र. २०:-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत विविध ठिकाणी ड्रेनेजलाईन व पिण्याचे पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. काही प्रभागामध्ये ड्रेनेजलाईन टाकणेचे काम अर्धवट स्थितीत आहेत. तसेच काही ठिकाणी नादुरुस्त आहेत. त्यामुळे ज्या ठिकाणी ड्रेनेजलाईन तुंबलेली आहे. अशा ठिकाणी जेट मशिनच्या सहायाने प्रेशर देवून तुंबलेली गटारे साफ करणे आवश्यक आहे. तसेच तेथील घान पाणी सक्शन मशिनच्या सहायाने बाहेर काढणे आवश्यक आहे. देहू नगरपंचायत कार्यालयाकडे जेट मशिन व सक्शन मशिन नसल्याने निविदा प्रक्रिया करुन भाडेपद्धतीने सदरच्या मशिनरी पुरवठा करुन कामे पुर्ण करणे आवश्यक आहे. याकरिता निविदा प्रक्रिया करुन संबंधित कामे पुर्ण करणेकरीता या ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- पौर्णिमा विशाल परदेशी

**अनुमोदक** :- सपना नागेश मोरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान: मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. २१ :-** **देहू नगरपंचायत हद्दीमध्ये डेंग्युजंन्य संसर्गाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी वारी / यात्रा व इतर वेळी आवश्यकतेनुसार डास प्रतिबंधक औषध फवारणी व इतर प्रतिबंधक उपाययोजना करणेबाबत.**

ठराव क्र. २१ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तीर्थक्षेत्र असल्याने या ठिकाणी वर्षातून तीन मोठ्या यात्रा भरत असतात. या दरम्यान मोठ्या संख्येने भाविक भक्त देहू शहरात दाखल होत असतात. त्यामुळे भाविकांना आरोग्याच्या दृष्टिने शहरात सर्व प्रभागात तीन ते चार दिवस धूर फवारणी व औषध फवारणी करणे आवश्यक आहे. तसेच इतर संसर्गजंन्य आजार उद्भवल्यास औषध व धूर फवारणी करणे आवश्यक असते. याअनुषंगाने सदर कामाकरीता निविदा प्रक्रिया करणेस व होणा-या खर्चास या ठरावन्वये सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- शितल अनिल हगवणे

**अनुमोदक** :-
प्रविण रामदास काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. २२ :-** **देहू नगरपंचायत हद्दीमध्ये स्वच्छता विषयी दैनंदिन कामे करण्याकरिता स्वच्छता कर्मचारी यांना आवश्यक साधने व वस्तु खरेदी करणेबाबत.**

**ठराव क्र. २२ :-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीत दैनंदिन निर्माण होणारा ओला व सुका कचरा संकलन करणे व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पापर्यंत पोहोच करणेकामी देहू नगरपंचायतीकडील स्वच्छता कर्मचारी कामकाज करीत असतात. त्यामुळे शासनाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे व सुचनाप्रमाणे सफाई कर्मचारी यांना दैनंदिन स्वच्छता करणेकरीता साधने व वस्तु उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. याकरीता निविदा प्रक्रिया करुन सदरची साधने व वस्तु खरेदी करणेसाठी या ठरावान्वये सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- प्रियंका अभिजित मोरे

**अनुमोदक** :- पुजा अमोल दिवटे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

विषय क्र. २३ :- **देहू नगरपंचायत करिता स्वतंत्र बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य निश्चित करणेबाबत.**

ठराव क्र. २३ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हि नवनिर्मित नगरपंचायत असुन नगरपंचायतीचे स्वतंत्र बोधचिन्ह व ब्रीदवाक्य असणे आवश्यक आहे. त्यासाठी स्थानिक ग्रामस्थांना आव्हान करून बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य तयार करून नगरपंचायत कार्यालयात देणे बाबत कळविण्यात आले . जर ग्रामस्थांनी चांगल्या प्रकारचे बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य नाही दिल्यास अडव्हाटायाझिंग एजन्सी मार्फत मागविण्यात यावे व जे योग्य असे बोधचिन्ह आणि ब्रीदवाक्य तयार करून घेण्यात यावे यासाठी होणाऱ्या खर्चास वित्तीय मान्यता देवून ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सुचक** :- आदित्य चिंतामण टिळेकर

**अनुमोदक** :- मिना राहुल कुऱ्हाडे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. २४:- तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत देहू नगरपंचायतीच्या संपुर्ण हद्दीमध्ये सुरक्षिततेच्या कारणास्तव CCTV कॅमेरे बसविणेबाबत विचार विनिमय करणे.**

**ठराव क्र. २४:-** सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तीर्थक्षेत्र असल्याने या ठिकाणी वर्षातून तीन मोठ्या यात्रा भरत असतात. या दरम्यान मोठ्या संख्येने भाविक भक्त देहू शहरात दाखल होत असतात. त्यामुळे भाविकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने कोणताही अनुचित प्रकार घडु नये याकरीता शहरातील मुख्य ठिकाणी CCTV कॅमेरे बसविणे आवश्यक आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचे प्रतिनिधी व पोलीस विभाग यांनी देहू शहराची पाहणी केली असून पोलीस विभागाच्या सुचनाप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे CCTV कॅमेरे बसविणे आवश्यक आहे. याकरीता विहित मुदतीत शासनास CCTV कॅमेरे बसविणेकरीता प्रस्ताव सादर करणे व पोलीस विभागाच्या सुचनाप्रमाणे शहरात आवश्यक त्या ठिकाणी CCTV कॅमेरे बसविणेकामी या ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- रसिका स्वप्नील काळोखे

**अनुमोदक** :- पूनम विशाल काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०

Scanned with OKEN Scanner

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे ....

**विषय क्र. २५ :- बांधकाम विभागामार्फत मागविण्यात आलेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

ठराव क्र. २५ :- १)नगरपंचायत बांधकाम विभागाअंतर्गत **देहू नगरपंचायत हद्दीत विविध विकास कामांचे अंदाजपत्रके तयार करणे, त्यास सक्षम प्राधिकारणाची तांत्रिक मंजूरी घेणे, रेखांकने तयार करणे त्यास शासनाची मंजूरी आणणे इत्यादी विविध कामांकरीता तांत्रिक सल्लागार नेमणेकामी** दिनांक २१/०१/२०२२ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीर प्रसिद्धीकरण करुन सदर कामाच्या ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन सदर कामासाठी एकुण तीन निविदा म्हणजेच १)प्रतिक व्ही साळुंखे २)तांबोळी ॲन्ड असोसीएट ३)वास्तुशिल्प असोसीएट इत्यादी प्राप्त आहेत. प्राप्त निविदांच्या तांत्रिक कागदपत्रे व आर्थिक दराचा तुलनात्मक तक्ता पाहता वास्तुशिल्प असोसीएट यांचे दर इतर कंत्राटदाराच्या तुलनेत कमी आहेत. त्याअनुषंगाने **वास्तुशिल्प असोसीएट** यांचे ई-निविदेतील दरास या ठरावान्वये सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश बाळासाहेब परंडवाल

अनुमोदक - मयूर दत्तात्रय शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

**मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

यांजकडे ...

**विषय क्र. २६ :-** **आस्थापना विभागामार्फत मागविण्यात आलेल्या निविदांना मंजूरी देणेबाबत.**

ठराव क्र. २६ :- १) नगरपंचायत आस्थापना विभागाअंतर्गत **देहू नगरपंचायत कुशल, अकुशल व अर्धकुशल कर्मचारी पुरवठा करणे** याकामी दिनांक २१/०१/२०२२ रोजी दैनिक वर्तमानपत्रात जाहीर प्रसिद्धीकरण करुन सदर कामाच्या ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन सदर कामासाठी एकुण दहा निविदा म्हणजेच १) आकाश इलेक्ट्रीकलस अॅन्ड इंजिनिअर्स २) भारती हॉस्पीस्पीटिली अँड सर्व्हिसेस ३) चिरंतन ४) दत्तगुरु इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस ५) जय गणेश एंटरप्राईजेस ६) आर. एन. जाधव ७) शार्प सर्व्हिसेस ८) श्री स्वामी सर्व्हिसेस ९) स्टाफींग सर्व्हिसेस १०) सुयोग एंटरप्राईजेस इत्यादी निविदा प्राप्त आहेत. प्राप्त निविदेतील तांत्रिक कागदपत्रांची छाननी केली असता, १) आकाश इलेक्ट्रीकलस अॅन्ड इंजिनिअर्स २) चिरंतन ३) जय गणेश एंटरप्राईजेस ४) आर. एन. जाधव या चार निविदाधारकांनी तांत्रिक कागदपत्रातील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याने त्यांना सदर कामाच्या निविदा प्रक्रियेतून वगळण्यात आले उर्वरित पात्र कंत्राटदार यांचे आर्थिक लखोटे उघडण्यात आले. पात्र असलेल्या निविदाधारकापैकी **भारती हॉस्पीस्पीटिली अँड सर्व्हिसेस** यांचे दर कंत्राटदाराच्या तुलनेत कमी असल्याने ही सभा त्यांचे निविदेतील दरास सर्वानुमते मान्यता देत आहे.

सुचक - योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक - आदित्य चिंतामण टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय क्र. २७ :- देहू आळंदी रोड मुख्य कमान रंग रंगोटी करणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

**ठराव क्र. २७** :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू हे तीर्थक्षेत्र असल्यामुळे हजारो भाविक भक्त देवदर्शनासाठी येत असतात त्यांच्या स्वागतासाठी तसेच गावाचे मुख्य प्रवेशद्वार येथे २० वर्षापूर्वी भव्यदिव्य स्वरुपात आर. सी. सी. कमान उभारली असुन त्या कमानीचा रंग आता फिका पडला आहे. तसेच लोकांनी कमानीला विविध प्रकारची स्टिकर्स लावल्यामुळे कमानीचा कलर उडाला आहे त्यामुळे कमानीला विद्रुपीकरण प्राप्त झाले आहे. मुख्य कमान देहू नगरपंचायतीचे प्रवेशद्वार असल्याने ती चांगली दिसण्यासाठी तीला चांगल्या कलर मध्ये रंगरंगोटी करण्यात यावी. यासाठी कोटेशन घेण्यात यावीत व ज्यांचे कोटेशन कमी दराने आहे त्यांना काम देण्यात यावे. सदर रंगरंगोटी काम जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराम महाराज बीज सोहळ्यापूर्वी करावे अशा स्वरुपाची चर्चा होऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**सुचक** :- सुधीर सुरेश काळोखे

**अनुमोदक** :- योगेश हनुमंत काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

## मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. २८ -देहू नगरपंचायत स्थापन झाल्यापासून दैनंदिन कामकाज करण्याकरिता केलेल्या विविध निविदांना व खर्चास मान्यता देण्याबाबत.

ठराव क्र. २८- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतीची स्थापना दिनांक ०८/१२/२०२० रोजी करण्यात आलेली आहे. त्यामुळे शासनाकडुन अनेक महत्वपुर्ण कामकाज देहू नगरपंचायतीस सोपविण्यात आलेले आहे. याअनुषंगाने देहू नगरपंचायतीच्या वतीने दैनंदिन आवश्यक कामे पुर्ण करणेकरीता कोणतेही निविदा प्रक्रिया झाली नसल्याने सदरची कामे स्थानिक कंत्राटदारामार्फत पुर्ण केली गेली आहेत. देहु शहरात विविध ठिकाणी ड्रेनेजलाईन दुरुस्ती करणे, पिण्याचे पाईपलाईन दुरुस्ती करणे, पाण्याचे वॉल बसविणे, चेंबर दुरुस्ती करणे, विविध मशिनरी भाड्याने पुरवठा करुन कामे पुर्ण करणे, पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक रसायन साहित्य पुरवठा करणे, आरोग्य विभागाकडील वाहन दुरुस्ती करणे , दैनंदिन कामकाजासाठी लागणारे नेट कनेक्शन व इतर अनुषंगीक कामे पुर्ण करुन घेतलेली आहे. त्यानुसार विविध कंत्राटदार यांनी सदर कामी होणारे देयक नगरपंचायत कार्यालयात सादर केलेली आहेत. तथापि देहू नगरपंचायतीकडे प्राप्त प्रलंबित देयके अदा करणेकरिता या ठरावान्वये आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - श्री.मयूर दत्तात्रय शिवशरण

अनुमोदक - प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

देहू नगरपंचायत

विषय नं.२९ :- **देहू नगरपंचायत कार्यालयात थोर महापुरुषांची जयंती साजरी करताना आवश्यक प्रतिमा, हार,फुले इ. आवश्यक वस्तूंची खरेदी करणेबाबत.**

ठराव क्र.२९:- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला.शासन आदेशानुसार थोर पुरुषांची जयंती हि शासकीय कार्यालयात साजरी करणे बंधनकारक असल्यामुळे देहू नगरपंचायत कार्यालयात महापुरुषांच्या फोटो प्रतिमा असणे आवश्यक आहे. त्यासाठी ज्या महापुरुषांच्या प्रतिमा या कार्यलयात नाहीत त्या खरेदी करणे आवश्यक असल्याने त्या खरेदी करण्यात यावेत. तसेच जयंतीच्या दिवशी लागणारे हार,फुले,व इतर आवश्यक साहित्य खरेदी करून सगळ्या महापुरुषांच्या जयंती उत्साहात साजऱ्या करण्यात याव्यात.त्यासाठी येणाऱ्या खर्चास वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- मिना राहुल कुल्हाडे

अनुमोदक :- पुजा अमोल दिवटे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. ३० :- देहू नगरपंचायत हद्दीमध्येआवश्यकतेनुसार नगरपंचायत फंडातून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकणेबाबत विचार विनिमय करणे.**

ठराव क्र. ३० :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये शासनाच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आलेली आहे. परंतू काही भागामध्ये पिण्याची पाईपलाईन टाकली नसल्याने तेथील रहिवासी नागरिकांना याचा नाहक त्रास होत आहे. तसेच काही ठिकाणी टाकण्यात आलेली लाईन नादुरुस्त असल्याने जास्ती दाबाने व सुरळीत पाणी पुरवठा होत नाही. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी नगरपंचायत कार्यालयाकडे प्राप्त होत आहेत. त्याअनुषंगाने ज्या भागामध्ये पिण्याची पाईपलाईन टाकणे आवश्यक आहे अशा भागाचा सर्व्हे करुन आवश्यकतेनुसार पिण्याची पाईपलाईन टाकण्याची कामे पुर्ण करणे आवश्यक आहे. याकरीता वार्षिक निविदा प्रक्रिया करुन आवश्यक त्या ठिकाणी पिण्याची पाईपलाईन टाकण्याचे काम पुर्ण करणेकरीता या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- रसिका स्वप्नील काळोखे

**अनुमोदक** :- सुधीर सुरेश काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय नं. ३१ : "माझी वसुंधरा अभियान २.०" च्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे व त्या अंतर्गत आवश्यक असणाऱ्या कामांना मंजुरी देणे.**

ठराव नं. ३१ : महाराष्ट्र शासन पर्यावरण व वातावरणातील बदल विभागामार्फत शासन निर्णय क्रमांक : अभियान - २०२०/प्र.क्र.१३४/ता.क.१ दि. १४ ऑक्टोबर २०२० रोजी "माझी वसुंधरा अभियान १.०" राबविण्याबाबत घोषणा करण्यात आलेली होती. या अभियानात राज्यातील ६६७ स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग होता. त्याच धर्तीवर ५ जून २०२१ रोजी "माझी वसुंधरा अभियान २.०" ची घोषणा करण्यात आली. हे अभियान दि.०५ जून २०२१ ते दि.३१ मार्च २०२२ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. या अभियानात राज्यातील ३७५२ स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग असणार आहे. या अभियानांतर्गत स्वराज्य संस्थेने केलेल्या कामाचे मूल्यमापन दि.०१ एप्रिल २०२२ ते दि. ३१ मे २०२२ या कालावधीत त्रयस्थ यंत्रणेमार्फत करण्यात येणार आहे. अभियानाचा निकाल जागतिक पर्यावरण दिनी म्हणजे दि. ०५ जून २०२२ रोजी जाहीर करून पुरस्कार वितरण करण्यात येणार आहे. सदर अभियानांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांनी पृथ्वी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वावर केलेल्या कामांचे मूल्यमापन करण्यासाठी खाली दिलेल्या विगतवारीनुसार ५००० गुण ठेवण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | पंचतत्वे | निर्देशक | गुण | कार्यवाही |
|---|---|---|---|---|
| १. | पृथ्वी (११००) | हरित आच्छादन व जैवविविधता | ७०० | पृथ्वी तत्वाशी संबंधित वनीकरण, वनसंवर्धन, हरितपट्टे विकसित करणे, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन व जमिनीचे धुपीकरण इत्यादी बाबींवर कार्य करणे आदी |
| | | घनकचरा व्यवस्थापन | ४०० | |
| २ | वायू (९००) | हवेच्या गुणवत्तेचे निरीक्षण | १०० | वायू तत्वाचे संरक्षण करता यावे म्हणून हवेच्या गुणवत्तेसाठी वायूप्रदूषण कमी करून हवेच्या गुणवत्तेत सुधारणा करणे, इलेक्ट्रिक वाहन वापरास प्रोत्साहन देणे, सायकलिंग पथ करणे आदी |
| | | वायू प्रदूषण कमी करणे | २०० | |
| | | नागरिकांमध्ये चांगल्या सवयींना प्रोत्साहन | १०० | |
| | | इलेक्ट्रिक वाहन धोरणाची अंमलबजावणी | ५०० | |
| ३ | जल (१०००) | जलसंधारण | १०० | जल तत्वाशी संबंधित नदी संवर्धन, सागरी जैवविविधता, जलस्त्रोतांचे सानार्धन व संरक्षण तसेच त्यांची स्वच्छता करणे आदी |
| | | गोड्या पाण्याच्या वापराचे परीक्षण व त्यामध्ये कपात | ५० | |
| | | रेन वाटर हार्वेस्टिंग | १५० | |
| | | जलस्त्रोतांचे पुनर्स्थापन/ | १०० | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सुशोभिकरण | | |
| | | विहिरींचे पुनर्स्थापन | १०० | |
| | | सांडपाणी प्रक्रिया | १५० | |
| | | पाण्याचा पुनर्वापर | ५० | |
| | | सणाच्या वेळी जलप्रदूषण कमी करणे | १०० | |
| | | पर्यावरण मूर्तीचा प्रचार | २०० | |
| ४ | अग्नी (८००) | अपारंपरिक उर्जा स्त्रोतांच्या वापरास प्रोत्साहन | २०० | अग्नी तत्वाशी संबंधित उर्जेचा परिणामकारक वापर, उर्जा बचत तसेच उर्जेचा अपव्यय टाळणे या बाबींना प्रोत्साहन देणे, अपारंपरिक उर्जेच्या निर्मितीसाठी नाविन्यपूर्ण उपक्रम, महामार्गाच्या दुतर्फा असलेल्या जागा, पडीक जमिनी, शेतांचे बांध यासारख्या जागांवर राबविणे. |
| | | कार्बन उत्सर्जन कमी असलेल्या विजेचा अवलंब | ६०० | |
| ५ | आकाश (१२००) | घेतलेल्या # ई प्लेज | १५० | आकाश या तत्वास स्थळ व प्रकाश या स्वरुपात निश्चित करून मानवी स्वभावातील बदलांसाठी जनजागृती व शैक्षणिक कार्यक्रमांद्वारे जनमाणसात बिंबवणे. |
| | | घेतलेल्या # ई प्लेजची पूर्तता | २०० | |
| | | माझी वसुंधराच्या अनुषंगाने जागरुकता | १०० | |
| | | माझी वसुंधराच्या अनुषंगाने प्रचार प्रसिद्धी | १०० | |
| | | स्पर्धांचे आयोजन | १०० | |
| | | यशोगाथेची निर्मिती | ५० | |
| | | अभियान तत्वे दर्शविणाऱ्या सार्वजनिक जागा | ५०० | |
| | | एकूण गुण | ५००० | |

निसर्गाच्या या पंचतत्वासोबत जीवन पद्धती अंगीकारल्याशिवाय आपण निसर्गासोबत जगू शकणार नाही आणि जैवविविधतेचेही अस्तित्व राहणार नाही. म्हणून राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना सोबत घेऊन तेथे या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारित उपाययोजना करून शश्वत निसर्गपूरक जीवनपद्धती अवलंबविण्यासाठी :माझी वसुंधरा" हे अभियान राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

२१. पावसाचे पाणी जमिनीत पुरावण्याच्या उद्देशाने शोषखड्डे बनवणे .

२२. शहरातील ओढे व तलाव या जलस्रोतांचे पुनर्स्थापित व सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करणे

२३. शहरातील सार्वजनिक विहिरी या जलस्रोतांचे पुनर्स्थापन व सुशोभीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करणे.

२४. प्रक्रिया करण्यात आलेल्या पाण्याचा पुनर्वापर करणे व त्या दृष्टीकोनातून उपाययोजना करणे.

२५. सणांच्या वेळी जलप्रदूषण कमी करणेच्या दृष्टीकोनातून पर्यावरणपूरक मूर्ती उपक्रम राबविणे व त्यांचे निर्माल्य विल्हेवाट लावण्याच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करणे .

२६. गणपती उत्सव व नवरात्री उत्सव , बैलपोळा , लक्ष्मी पूजन इत्यादी प्रकारच्या सणांना , उत्सवांना पर्यावरण पूरक साजरा करणेच्या दृष्टीकोनातून पर्यावरण पूरक मूर्तींचा प्रचार करणे.

२७. जलकुंभाजवळील अतिक्रमणे हटवणे व सुशोभिकरण करणे.

२८. अक्षय उर्जा स्रोताच्या वापरास प्रोत्साहन देण्यासाठी प्रचारात्मक आणि जागरुकता निर्माण करणारे उपक्रम राबविणे.

२९. शहरात जास्तीत जास्त सौर LED दिव्यांची संख्या व वाढवणे . त्या अनुषंगाने शहरात LED दिवे व सौर दिवे बसविणे.

३०. शहरातील सार्वजनिक इमारतींच्या छतावर सौर पॅनल बसविणे व तसे त्यांना बंधनकारक करणे

३१. शहरात जास्तीत जास्त ग्रीन इमारतीची उभारणी होईल या दृष्टीकोनातून कार्यवाही करणे. ( हरित इमारत म्हणजे जी परंपरागत इमारतीच्या तुलनेत कमी पाण्याचा वापर करते , ऊर्जा कार्यक्षमतेला अनुकूल करते , नैसर्गिक संसाधनांचे संरक्षण करते . कमी कचरा निर्माण करते आणि रहिवाशांसाठी निरोगी जागा पुरवते . हरित इमारत स्थानिक फुटप्रिंट कमी करण्यास मदत करते )

३२. शहरातील सर्व शासकीय इमारतीची उर्जा लेखापरीक्षण करणे , एनर्जी ऑडीट करणे कामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणे.

३३. शहरात जास्तीत जास्त नागरिक माझी वसुंधरा # ई प्लेज घेतली पाहिजे या दृष्टीकोनातून अंमलबजावणी करणे . सामुदाईक # ई प्लेज कार्यक्रमचे आयोजन करणे .

३४. " माझी वसुंधरा अभियान २.० " च्या प्रचार प्रसिद्दी करिता व जनजागृती करिता त्रयस्थ संस्थेची नेमणूक करणे. त्याअनुषंगाने जनजागृतीकरिता साहित्य खरेदी करणे.

३५. शहरातील प्रमुख चौकांच्या भिंतींवर प्रबोधनात्मक चित्रे , घोषणावाक्ये लिहीणे ,

३६. शहरातील सर्व शाळांची प्रभात फेरी काढणे , चित्रकला , निबंध , रांगोळी स्पर्धांचे आयोजन करणे , प्रश्नमंजुषांचे आयोजन करणे , त्याकामी बक्षीस वितरण समारंभ घेणे , त्याची प्रसिध्दी देणे व त्या अनुषंगाने प्रचारप्रसिद्धी व जनजागृती करणे कामी त्रयस्थ संस्था नेमणे.

३७. पथनाट्याचे आयोजन करणे , त्याकामी व्हि.डी.ओ. चित्रीकरण करणे , त्याचे ऑडीओ क्लिप तयार करणे , त्याच्या सादरीकरण करणेसाठी नियोजन करणे

३८. विविध स्पर्धांचे आयोजन करणे व विजेत्याची पर्यावरण दूत म्हणून नेमणूक करणे .

३९. # ई प्लेज स्वीकारण्यावर # ई प्लेजची पूर्तता ( Upkeep ) वर आधारित यशोगाथा तयार करणे - वैयक्तिक / सामुदायिक ( किमान १० )

Scanned with OKEN Scanner

"माझी वसुंधरा अभियान २.०" मध्ये देहू नगरपंचायतीचा गुणानुक्रम अग्रमानांक असलेल्या शहरामध्ये येण्याच्या अनुषंगाने खाली नमूद केलेल्या कामांना प्रशाकीय व आर्थिक मंजुरी देणे उचित ठरेल.

१. माझी वसुंधरा अभियान १.० अंतर्गत लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची देखभाल करणे व जिवंत ठेवणे.

२. शहरातील हेरीटेज वृक्षांची गणना करून जिओ टगिंग करणे.

३. शहरातील पूर्वीचे अस्तित्वात असलेले व नवीन लागवड करण्यात आलेल्या वृक्षांची जी. पी. एस. प्रणालीच्या माध्यमातून गणना करून जिओ टगिंग करणे. त्या अनुषंगाने त्रयस्थ संस्था नेमणे.

४. शहरात न. प. मालकीची झाडांची नर्सरीची निर्मिती करणे व त्याची देखभाल-दुरुस्ती करणे.

५. शहरात नवीन हरित क्षेत्र विकसित करणे. उदा. अमृत वन, जैव-विविधता उद्यान फुलपाखरू उद्यान, मधुमक्षिका पार्क, पक्षी उद्यान .

६. जैव-विविधता नोंदवही तयार करणे व त्याची पूर्तता करणे त्या अनुषंगाने त्रयस्थ संस्था नेमणेकामी निविदा करणे.

७. शहराच्या एकूण क्षेत्रापैकी ३३ % हरित आच्छादन तयार करण्याच्या अनुषंगाने कृती आरखडा तयार करणे.

८. शहरात देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करणे.

९. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नागरी घनकचरा संकलन , वहन व शास्त्रोक्त प्रक्रिया करणे या सर्व गोष्टींची अंमलबजावणी करणे

१०. शहरात प्लास्टिक बंदी करणे व त्यानुसार उपाययोजना करणे

११. घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पावरती साठलेल्या जुना कचरा शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे .

१२. सुका कचरा पुनर्वापरासाठी उपाययोजना करणे.

१३. MoEFCC , NABL , MPCB मान्यता प्राप्त प्रयोगशाळेतून महिन्यातून एकदा हवा गुणवत्ता तपासणी करून घेणे. त्या अनुषंगाने त्रयस्थ संस्था नेमणे.

१४. शहरात फटाक्यांवर बंदी घालण्याच्या उद्देशाने उपाययोजना करणे.

१५. शहरातील निर्माण होणारा बांधकाम राडारोडाचे व्यवस्थापन करणे , तसेच त्याचा पुनर्वापर करणे

१६. नागरिकांमधील चांगल्या सवयींना प्रोत्साहन देणेकरीता शहरातील मुख्य रस्त्यासह सायकलिंग ट्रक तयार करनेव सायकल वापरास प्रोत्साहन देणे.

१७. इलेक्ट्रिक वाहन वापरासाठी नागरिकांना प्रोत्साहन देणे . त्या अनुषंगाने शहरात चार चाकी व २ चाकी करिता चार्जिंग स्टेशन तयार करणे तसेच शहरात जनजागृती कम्प आयोजित करणे.

१८. शहरात नवीन जण संधारण उपक्रम हाती घेणे व त्याची अंमलबजावणी करणे

१९. शहरातील सर्व शासकीय इमारतींची पाण्याचे लेखापरीक्षण करणे , तसेच शहराच्या पाणी योजनेचे पाण्याचे लेखापरीक्षण करणे

२०. शहरातील सर्व सार्वजनिक इमारतीमध्ये रेन वाटर हार्वेस्टिंग करणे , त्या अनुषंगाने शहरातील सर्व सार्वजनिक इमारत धारकांना रेन वाटर हार्वेस्टिंग करणे बंधनकारक करणे

Scanned with OKEN Scanner

४०. माझी वसुंधरा तत्वे दर्शवणाऱ्या सार्वजनिक जागा तयार करणे व त्या वरती माझी वसुंधरा लोगो असलेले पाटी लावणे ( उदा : सौर दिवे , रस्त्याच्या कडेला वृक्ष लागवड असलेला माझी वसुंधरा अभियान मार्ग , पाण्याचा पुनर्वापर सूचित करण्यासाठी माझी वसुंधरा अभियान कारंजे , माझी वसुंधरा अभियान हरित पट्टे ज्यात भारतीय प्रजातीची झाडे , ठिबक सिंचन प्रणाली , जमीन आणि पाण्याचा पुनर्वापर यांचा समावेश आहे ) .

४१. माझी वसुंधरा अभियान प्रचार प्रसिद्धी करिता फेसबुक , Insta , twiter , youtube आदी सोशल माध्यामावरती नियमित स्वरुपात पोस्ट टाकणे.

४२. प्रभागनिहाय स्वच्छ हरित वार्ड स्पर्धेचे आयोजन करणे व विजेत्यास बक्षीस देऊन सन्मानित करणे .

४३ माझी वसुंधरा अभियानाची अंमलबजावणी प्रभावीपणे पूर्ण होणेकामी अनुषंगिक आवश्यक इतर कामे करणे.

" माझी वसुंधरा अभियान २.०" देहू नगरपंचायत हद्दीत प्रभावीपणे राबविण्याच्या अनुषंगाने नमूद केलेल्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेकरिता आवश्यक असलेली माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन " माझी वसुंधरा अभियान २.०" ची अंमलबजावणी प्रभावीपणे पूर्ण होणेकामी व अभियानामध्ये देहू शहराचा गुणानुक्रम उच्चाविण्यासाठी वरील विषया अंतर्गत नमूद केलेल्या सर्व बाबी व कामे करण्यात यावी तसेच त्यासाठी होणारा खर्च हा १४/१५ वित्त आयोग प्राप्त निधी , स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत प्रोत्साहन निधी , महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना व इतर शासकीय निधी अथवा नगरपंचायत फंड अंतर्गत करण्यात यावा . सदर विषया अंतर्गत नमूद केलेल्या सर्व बाबींना व कामांना हि सभा प्रशासकीय व होणाऱ्या खर्चास आर्थिक मान्यता देत आहे.

**सुचक** :- ज्योती गोविंद टिळेकर

**अनुमोदक** :- स्वप्ना योगेश मोरे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

विषय नं ३२ स्वच्छ सर्वेक्षण २०२२ च्या कार्यवाहीबाबत विचार विनिमय करणे व त्या अंतर्गत आवश्यक असणाऱ्या कामांना मंजुरी देणे.

ठराव नं. ३२ : मा . गृहनिर्माण व नागरी कार्य मंत्रालय , भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासनाच्या संयुक्त विद्यमाने परमपूज्य महात्मा गांधीजींच्या १५० व्या जन्मशताब्दी निमित्त त्यांना आदरांजली म्हणून दिनांक ०२ ऑक्टोंबर २०१४ पासून स्वच्छ भारत अभियान सुरू केले . त्यानुसार ०२ ऑक्टोबर २०१ ९ पर्यंत संपूर्ण भारत स्वच्छ व हागणदारी मुक्त करण्याचे व त्याचे सातत्य पुढे कायमस्वरूप टिकून ठेवण्याचे स्वच्छ भारत अभियानाचे मुख्य ध्येय आहे . त्याच अनुषंगाने २ ऑक्टोबर २०२१ रोजी स्वच्छ भारत अभियान २ ची घोषणा करण्यात आली आहे .

केंद्रीय मंत्रालयाने अवलंबिलेल्या दूरगामी धोरणामुळे राज्यांना आणि सर्व शहराना हे अभियान त्यांच्या स्तरावर यशस्वीपणे राबविण्यासाठी व त्यांची क्षमता वाढविण्यासाठी उपयुक्त ठरले आहे . त्याचबरोबर नागरिक आणि इतर भागीदार यांचा स्वच्छ भारत अभियानामध्ये सक्रिय सहभाग वाढविण्यास मोलाची मदत झालेली आहे . स्वच्छ सर्व्हेक्षण २०२२ च्या कार्यपध्दतीमध्ये शहराचा गुणानुक्रम निश्चित करण्यासाठी संकलित केलेल्या माहितीचे मुख्य तीन बाबीत विभाजन होते .

| अ. क्र | बाब | मुद्दे | गुणांची विभागणी | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| १ | सेवा स्तर प्रगती ( Service Level Progress-SLP) ४०% | संकलन व वहन | ९०० | |
| | | प्रक्रिया आणि विल्हेवाट लावणे | १२०० | |
| | | शाश्वत स्वच्छता | ९०० | ३००० |
| २ | प्रमाणपत्रे (Certification) ३०% | ७ स्टार मानांकन | १२५० | २२५० |
| | | ODF ++ | १००० | |
| ३ | नागरिकांद्वारे (Citizen' s Voice) ३०% | नागरिकांचा अभिप्राय (१० प्रश्न) | १२५० | २२५० |
| | | नागरिकांचा सहभाग | ५५० | |
| | | प्रत्यक्ष तपासणी दरम्यान नागरिकांचा अनुभव | ३५० | |
| | | स्वच्छता ॲप | ४०० | |
| | | नाविन्यपूर्ण उपक्रम ( न.प. व नागरिक) | १५० | २००० |
| | | आपत्ती व्यवस्थापन तयारी | २०० | |
| | | | एकूण गुण | ७५०० |

देहू नगरपंचायत

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये पूर्ण देशभरातून एकूण ४३८३ शहरांचा सहभाग असणार आहे व त्यांचा गुणानुक्रम हा वेगवेगळ्या पाच झोन मध्ये लोकसंख्येच्या निकषानुसार रविण्यात येणार आहे . तसेच पहिल्या तीन स्वच्छ शहरांना क्लीनेस्ट सिटी अवार्ड देण्यात येणार आहे . देहू नगरपंचायतीचा २५ हजार पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये समावेश होतो व पूर्ण देशातून २३४३ शहरांसोबत देहू नगरपंचायतीची स्पर्धा असणार आहे .

देहू स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये नगरपंचायतीचा गुणानुक्रम अग्रमानांक असलेल्या शहरांमध्ये येण्याच्या अनुषंगाने खाली नमूद केलेल्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मजुरी देणे उचित ठरेल .

१. ओल्या कल्यावर प्रक्रिया सुक्या कचल्यावर प्रक्रिया , बांधकाम राडारोडा प्रक्रिया , Material Recovery Center याची संपूर्ण अंमलबजावणी करणे तसेच DPR च्या कामांकरिता लागणाऱ्या नियोजित जागेकरिता शासनास जागा मागणी करणे , अथवा खाजगी जागा भाडेपट्ट्याने किंवा खरेदी करणे

२. SWM मंजूर DPR मधील उपकरणे , मशिनरी , यंत्रे व वाहने GEM पोर्टल वरून खरेदी करणे .

३. SWM मंजूर DPR मधील Miscellaneous item अंतर्गत Sanitary Vending व Disposal मशीन व इतर साहित्य खरेदी करणे व त्यांचे देखभाल दुरुस्ती करणे .

४. स्वच्छ सर्व्हेक्षण मोहिमेअंतर्गत स्वच्छते संदर्भात विविध प्रकारचे होर्डिंग घनकचरा प्रक्रिया केंद्रावर बनविणे , तसेच छोटे छोटे होर्डींग्ज , सर्व्हेक्षण बोर्ड , स्टिकर , माहिती पत्रक इत्यादी आय. सी. टी. ( माहिती व संपर्क प्रणाली ) शहरातील प्रमुख चौकांमध्ये लावणेसाठी छपाई करून घेणे व ते लावणे .

५. घर ते घर घनकचरा संकलन व वाहतुक प्रक्रीये साठी IEC Based प्रणाली कार्यान्वित करणे ( GPS , बार कोड प्रणाली , मोबाईल अप्लिकेशन आदी . )

६. घंटागाडी मार्गाचे बोर्ड , शहरात रस्तेमार्ग ठिकाणे व्यापारी ठिकाणे , शौचालय , स्वागत कमानी , याच्या नावाचे बोर्ड तयार करून घेणे व ते लावणे .

७. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ अंतर्गत जनजागृती , प्रचार प्रसिद्धी व घनकचरा व्यवस्थापन नियोजानासाठी अनुभवी संस्था नेमणे .

८. विभागीय आयुक्त कार्यालय पुणे यांच्या मार्फत नियुक्त करण्यात आलेल्या शहर समन्वयक या कंत्राटी पदाचे नियुक्तीचे वेतन न.प. अथवा इतर शासकीय निधुमधून अदा करणे .

९. शहरातील सर्व शाळांची प्रभात फेरी काढणे , चित्रकला , निबंध , रांगोळी इ . विविध स्पर्धांचे आयोजन करणे , प्रश्नमंजुषांचे आयोजन करणे , त्याकामी बक्षीस वितरण समारंभ घेणे , त्याची प्रसिध्दी देणे .

१०. ODF + च्या दृष्टीकोनातून शहरातील सर्व सार्वजनिक शौचालयांची पाहणी करणे , दुरुस्ती करणेबाबत अहवाल तयार करून नुतनीकरण करणे , त्या ठिकाणी पाणी , वीज व्यवस्था करणे आवश्यक त्या ठिकाणी नळ कनेक्शनची जोडणी करणे , शौचालय आवारात वृक्षारोपण करून सुशोभीकरण करणे , भितीचीत्रे , घोषवाक्य लिहिणे ई . तदअनुषंगिक कार्यवाही करणे .

११. स्वच्छ सर्व्हेक्षणासाठी लागणारी सर्व स्टेशनरी , रजिस्टर्स , फाईल्स व तदअनुषंगिक बाबी खरेदी करणे

१२) IEC अंतर्गत कामे करणेकामी लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयाने स्वच्छ सर्वेक्षण विषयक महिला मेळावे घेणे , प्रश्नमंजुषा , विद्यार्थी व शाळा स्पर्धा , महिलांचे रांगोळी स्पर्धा , मेंदी स्पर्धा , स्वच्छ ward

Scanned with OKEN Scanner

स्पर्धा हरित वार्ड स्पर्धा , वार्ड शुशोभीकरण स्पर्धा , स्वच्छता ॲप / स्वच्छ मंच कॅम्प व इतर अनुषंगिक स्पर्धा प्रभागनिहाय घेणेत याव्यात व प्रभागनिहाय बक्षीसे देणेत यावीत . तसेच इतर सर्व स्पर्धक यांना प्रोत्साहनपर सत्कार बक्षीस / मानपत्र / पारितोषिके देणेत यावीत यासाठी होणाऱ्या खर्चास मंजुरी देणे .

१३. शहरातील दर्शनीय चौक व फुटपाथ तसेच नियमित कचरा पाडणाऱ्या ठिकाणी हरितपट्टे विकसित करणे , बेंच टाकणे , वाचनालय तयार करणे , पुतळे उभारणे इत्यादी प्रकारचे सुशोभिकरण करणे .

१४. शहरात नियमित कचरा पडणाऱ्या ठिकाणी स्वच्छता करून सुशोभिकरण करणे व त्याचे सातत्य ठेवणे.

१५. नगरपंचायत पदाधिकारी , बाधिकारी , समन्वयक , कर्मचारी यांचा यापूर्वी स्वच्छ सर्वेक्षण मध्ये चांगली कामगिरी केलेल्या शहरास अभ्यास दौऱ्याचे नियोजन करणे .

१६. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार व दिनांक १ / ०६ / २०१ ९ व महाराष्ट्र नगरपंचायत , नगरपंचायत व औद्योगिक वसाहती अधिनियम १ ९ ६५ नुसार घनकचरा उपयोगकर्ता शुल्क पर पट्टीच्या माध्यमातून संकलन करणे .

१७. शहरातील रहिवासी क्षेत्र , झोपडपट्टी क्षेत्र , जुने गावठाण , वाढीव क्षेत्र , रस्ते , मंदीरे , शाळा , व्यापारी क्षेत्रे , मंडई क्षेत्र , सार्वजनिक शौचालये , मुता - या यांची अभियनाअंतर्गत साफसफाई करणे व स्वच्छ ठेवणेबाबत सर्व नागरिकांना संदेश पाठविणे , Bulk SMS त्याची पूर्तता करणे .

१८. स्वच्छ सव्हेक्षण संदर्भात विविध कामांचे आदेश , नोटीसा तयार करून प्रसिध्द करणेबाबतचे अहवाल छपाई करणे .

१९. शहरातील जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग वाढवण्यासाठी शहरातील सर्व संघटना , विविध मंडळे , शाळा , महिला बचत गट , RWA , धार्मिक नेते , असोसिएशन व इतर यांच्या वेळोवेळी बैठक आयोजित करणे , प्रभागनिहाय कार्यशाळा , मिटिंग , जनजागृती कार्यक्रम , इतर अनुषंगिक उपक्रम राबविणे . त्याचे फोटो काढून अहवाल तयार करणे व जनजागृती करणे .

२०. बांधकाम राडारोडा ( C & D Waste ) प्रक्रिया व विल्हेवाट शहरापासून ५ किमी च्या आत कचरा पुर्नप्रक्रिया व्यवस्थापन केंद्र स्थापन करणे आवश्यक आहे . यामध्ये C आणि D या प्रकारात निर्माण होणारा कचरा पुर्नप्रक्रियेसाठी वापरणे आवश्यक आहे . C आणि D वेस्ट यामध्ये प्रामुख्याने जागेवर नवीन बांधकाम करताना व जुने बांधकाम पाडताना होणा - या कच - याचे संकलन व प्रक्रियाची व्यवस्था करून कचरा निर्मात्याने कचरा संकलित करणे , कॉंफिट , माती , स्टील , लाकूड , प्लास्टिक , फरशी , स्टाईल्स , विटा , रेतीमिश्रीत सिमेंट यांचे वर्गीकरण करण्यात यावे . एकंदरीत अनुभवावरून शहरातील मिळकतदार अशाप्रकारचा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकतात व शहरीकरण करतात . तरी अशा प्रकारचा कचरा सार्वजनिक ठिकाणी टाकणाऱ्या व्यक्ती अथवा संस्था यांचेकडून दंड आकारण्यात यावा. नगरपंचायतीमार्फत C आणि D वेस्टचा वापर रस्ते भराव तसेच इतर आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात

२१. शहरात उघडयावर कचरा टाकताना दिसलेस कचरा वेगळा न दिलेस गटारीमध्ये कचरा टाकलेस घनकचरा व्यवस्थापन अधिनियम २०१६ नुसार दंड करणे व पेपरमध्ये प्रसिध्दी देणे आवश्यक आहे .

२२. महाराष्ट्र प्लॅस्टिक व अविघटनशील कचरा ( नियंत्रण ) कायदा 2006 च्या कलम ( एच ) व कलम 4 चे पोटकलम 1 व 2 या द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन प्लॅस्टिक

वि. प्लॅस्टिक अविघटनशील वस्तूंचे ( उत्पादन वापर , विक्री , वाहतुक हाताळणी साठवणूक ) अधिसुचना 2018 दिनांक 23 मार्च 2018 पासून अंमलबजावणी करण्यात आलेली आहे . त्यानुषंगाने जे व्यवसायिक , विक्रेते , साठवणुकदार , वापणारे वरील नियमांचे पालन करणार नाहीत , त्यांच्यावर पहिला गुन्हा रक्कम रुपये 5000 / - , दुसरा गुन्हा राम रुपये 10,000 / - व तिसरा गुन्हा रक्कम रुपये 25,000 / - व तीन महिन्याचा कारावास अशी कारवाईची तरतुद असलेमुळे त्यानुसार प्रभावीपणे अंमलबजावणी करणे .

२३. शहरातील सार्वजनिक ठिकाणांचे जाहिरात फलकांमुळे होणारे विद्रुपीकरण थांबवणे कमी नियमावली ठरुन देणे .

२४. शहरातील सर्व हॉस्पिटलमध्ये निर्माण जैविक कचरा शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावणे कामी उपायोजना करणे .

२५. दंडाच्या सर्व तरतुदी , स्वयं घोषणा , व इतर स्वच्छ सर्वेक्षण २०२२ बाबतच्या प्रसिद्दी स्थानिक वृत्तपत्रात देणे .

२६. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये शहराची कामगिरी अग्रमानांक शहरामध्ये येण्याकरीता ३ किंवा ५ स्टार मानांकन व ODF + घोषित करणे , तसेच त्याअनुषंगाने शहरातील लोकप्रतिनिधी , नागरिक , BWG , नगरपंचायत आदी . चे स्वयंघोषणा पत्र भरून घेणे तसेच इतर अनुषंगिक कामांना आर्थिक मंजुरी देणे .

२७. शहरात जमा होणाऱ्या ओला कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तात्पुरत्या स्वरूपात शेड तयार करणे व कंपोस्ट पिट घरेदी करून कंपोस्ट चालू करणे

२८. शहरात जमा होणाऱ्या सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी तात्पुरत्या केंद्र MRE Center तयार करणे व प्रकल्प चालू करणे अथवा कचरा त्रयस्थ संस्थेस प्रक्रीयेसाठी देणे ,

२९. जास्तीत जास्त ओल्या कचऱ्याची निर्मितीच्या ठिकाणी विल्हेवाट लावणेकामी ओल्या कचऱ्यापासून घरीच कम्पोस्ट खत तयार करणे तसेच मोठ्या प्रमाणात कचरा ( ५० KG पेक्षा जास्त) तयार करतात. त्यांनी त्याची निर्मितीच्या ठिकाणी प्रक्रिया करणे , गृहनिर्माण संस्था, नागरिक, शाळा, वस्तीगृह, हॉटेल, हॉस्पिटल , सरकारी ऑफिस यांना बंधनकारक करणे

३०. शहरातील प्रमुख चौकांच्या भिंतीवर , सार्वजनिक इमारती याठिकाणी प्रबोधनामक चित्रे , घोषणावाक्ये लिहिणे, तसेच शौचालयांवर लावणेसाठी स्टिकर बनवून घेणे .

३१. शहरातील ओढे व नाले यांच्या वरील असलेले पुलांच्या ठिकाणी पचरा पढवासी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून दोन्ही बाजूस जाळी अथवा पत्रे लावणे.

३२. घनकचरा व्यवस्थापन संबंधित कर्मचा - यांना हण्डग्लोज, जकेट, युनिफॉर्म, बूट, अभियानाचे नांव असणारे टी शर्ट , बॅग इ. प्रकारचे वैयक्तिक सुरक्षा साधने ( PPE ) खरेदी करणे.

३३. सर्व सफाई कर्मचारी यांचा आरोग्य विमा काढणे, तसेच दरमहा उत्कृष्ट कर्मचाऱ्यास पुरस्कृत करणे .

३४. घंटागाडी व सार्वजनिक शौचालयासाठी देखरेख व संपर्क प्रणाली Monitoring Feedback System बसविणे व देखभाल दुरुस्ती करणे .

३५. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिम आयोजित करून सफाई करून घेणे व तसेच तेथे ओल्या व सुक्या कच - यासाठी कुंड्या/ बीन खरेदी करून बसवणे व त्या स्वच्छ ठेवणे , उदा . व्यापारी ठिकाणे

Scanned with OKEN Scanner

३६. स्वच्छ सर्व्हेक्षणाबाबत शहरातील सर्व दवाखाने , शाळा , सार्वजनिक संस्था , हॉटेल्स , बाजारपेठा , मार्केट असोसिएशन , इत्यादींना भेट देऊन त्याबाबत माहिती देणे व दरमहा स्वच्छ सर्व्हेक्षण रकिंगचे फॉर्म भरून घेणे

३७. घंटागाडी GPS यंत्रना सुव्यवस्थित करणे तसेच GPS पे व CTS व PTs यांचे Geo Togging Google Map तयार करून त्याच्या लोकेशनचे स्क्रीन शॉट काढून रेकॉर्ड तयार करणे

३८. शहरातील सर्व शौचालय मैला टाक्या GPS यंत्रणा वापरून Geo Tagging करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणे.

३९. शहरातील कचरा वेचकांचा शोध घेणे तसेच त्यांना प्रशिक्षण देणे , त्यांचे प्रबोधन करणेकामी कार्यक्रमाचे आयोजन करणे

४०. प्रभागनिहाय स्वच्छ हरित वार्ड स्पर्धेचे आयोजन करणे व विजेत्यास बक्षीस देऊन सन्मानित करणे

४१. शहरात संकलन होणाऱ्या कचऱ्यातील प्लास्टिक एकत्रित करून त्यावर प्रक्रिया करणेकमी Recycling Agency ला पाठवणे

४२. आपत्ती व्यवस्थापनसंबंधी कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे.

४३. शहरातील सर्व शौचालय मैला उपसा व वाहतूक करणाऱ्या संस्थाना मैला पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या किंवा इतर मैला प्रक्रिया केंद्रावरती प्रक्रियेसाठी देणे बंधनकारक करणे व त्यांचे सोबत सामंजस्य करार करणे.

४४. शहरात मैला व्यवस्थापन करिता FSTP plant उभारणे व त्याकरिता शासकीय जागा मागणी करणे अथवा खाजगी जागा खरेदी करणे .

४५. शहरातील बंदिस्त नाले व शौचालय मैला टाकीफाई करणे करिता Vacuum Emptier अथवा Suction Machine व सार्वजनिक शौचालय व मुतारी स्वच्छता करणे करिता Jeting Machine व पाणी Tankar GeM Portal द्वारे खरेदी करणे .

४६. ODF + च्या दृष्टीकोनातू शौचालयाच्या ठिकाणी लागणाऱ्या मुलभूत गोष्टींची खरेदी करणेकामी वार्षिक दर करार करणे . ( साबण , handwash , मग , बादली , dust bin , रुम फ्रेशनर , आरसा , वायपर , झाडू , sanitary napkin Disposal & vending machine , बल्ब , पेपर नपकिं , गमबूट , रेफ्लेक्टटेड कोट , टोपी , मास्क , असिड , फिनेल , निरमा , ब्रश इ . इतर अनुषंगिक वस्तू ).

४७. शहरातील घनकचऱ्याची शास्त्रोक्त पद्धतीने १०० % विल्हेवाट लावणेकामी SWM मंजूर DPR मधील कामे पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात , Compost Plant , Material Recovery Center , C & D Waste Management Center , Sanitary Landfill , Plastic processing Unit , Hazardous Waste Processing Unit तयार करणे व कार्यान्वित ठेवणे .

४८. शहरातील रहिवाशी ठिकाणे दिवसातून एकदा तर व्यापारी ठिकाणे दिवसातून दोनदा झाडूसफाई करून दृष्टीकोनातून उपाययोजना करणे.

४९. शहरातील ओढे नाले तलाव या ठिकाणी कोणत्याही प्रकारचा घनकचरा व प्लास्टिक दिसायला नको या दृष्टीकोनातून उपाययोजना करणे.

Scanned with OKEN Scanner

3R Principles च्या अनुषंगाने शहरात माणुसकीची भिंत तयार करणे , बरतन बँक , कपडा बँक , टाकाऊ पासून टिकाऊ आदी.

५१. स्वच्छता निरीक्षक व त्या वरील कर्मचारी यांचे प्रत्येकी ई लर्निंग कोर्स करून घेणे .

५२. कचरा डेपो वरती अस्तित्वात असलेल्या साठलेल्या जुन्या कचऱ्यावर प्रक्रिया करणे.

५३. स्वच्छ सर्वेक्षण अंतर्गत नगरपंचायत मार्फत व नागरीकांमार्फत प्रत्येकी किमान १ नाविन्यपूर्ण उपक्रम करणे , संबंधित कामे करणे .

५४. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ , ODF , स्टार रेटिंग याच्या दृष्टीकोनात आवश्यक असणारे विद्युत विभागा संबधित कामे करणे ,

५५. स्वच्छ सर्वेक्षण २०२२ , ODF , स्टार रेटिंग याच्या दृष्टीकोनात आवश्यक असणारे बांधकाम विभागासंबंधित कामे करणे.

५६. स्वच्छ सर्वेक्षण २०२२, ODF, स्टार रेटिंगची प्रभावी अंमलबजावणी होणेकामी अनुषंगिक आवश्यक इतर सर्व कामे करणे.

स्वच्छ सर्वेक्षण २०२२ गुणानुक्रम उंचावण्याच्या अनुषंगाने नमूद केलेल्या कामांना प्रशासकीय व आर्थिक मंजुरी मिळणेकरिता आवश्यक असलेली माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली. त्यावर सविस्तर चर्चा होऊन स्वच्छ सर्वेक्षण २०२२ ची अंमलबजावणी प्रभावीपणे पूर्ण होणेकामी व स्वच्छ सर्वेक्षण २०२२ मध्ये देहू शहराचा गुणानुक्रम उच्चाविण्यसाठी वरील विषयाअंतर्गत नमूद केलेल्या सर्व बाबी व कामे करण्यात यावी. त्यासाठी होणारा खर्च हा १५ वित्त आयोग प्राप्त निधी, स्वच्छ महाराष्ट्र अभयन अंतर्गत प्रोत्साहन निधी, महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना व इतर शासकीय निधी अथवा नगरपंचायत फंड अंतर्गत करण्यात यावा. सदर विषयाअंतर्गत नमूद केलेय बाबींना व कामांना हि सभा प्रशासकीय व होणाऱ्या खर्चास आर्थिक मान्यता देत आहे.

सुचक :- सुधीर सुरेश काळोखे

अनुमोदक :- पुजा अमोल टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

# मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ३३- घनकचरा व्यवस्थापनाकरीता तात्पुरत्या स्वरुपात वाहने कंत्राटी पद्धतीने घेणेबाबत.

ठराव क्र. ३३- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतीकडे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत दैनंदिन शहरात निर्माण होणारा कचरा संकलन करणे व घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प या ठिकाणी नेणेकामी देहू नगरपंचायतीकडे सुस्थितीत तीन घंटागाड्या व तीन ट्रॅक्टर अस्तित्वात आहेत. देहू नगरपंचायत हे तीर्थक्षेत्र असल्याने येणाऱ्या भाविक भक्तांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. तसेच दैनंदिन तरंगती लोकसंख्या देखील दहा ते पंधरा हजाराच्या जवळपास असते. त्यामुळे शहरात निर्माण होणारा कचरा संकलन करणेकरीता देहू नगरपंचायतीकडील अस्तित्वात असलेली कचरा वाहतूक वाहने कमी पडत आहेत. त्याअनुषंगाने सदर कामाची आवश्यकता पाहता कचरा संकलन करणेकरीता अतिरीक्त वाहने भाडेतत्वावर घेणेकामी निविदा प्रक्रिया करणे व होणा-या खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक - प्रविण रामदास काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय ३४ : देहू स्मशानभूमीत अंतिम संस्कार करणे कामी विद्युत दाहिनी / गॅस शवदाहिनी घेणेबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.**

ठराव ३४ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू शहरात सद्यस्थितीत अंत्यविधीसाठी एकच स्मशान भूमी उपलब्ध आहे. या ठिकाणी विविध दुरुस्ती कामे पुर्ण करणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात असल्याने अत्यंविधी करतांना आधूनिक पर्यावरण पुरक गॅस शवदाहिणी यंत्रणा बसविणे हे शासनाच्या विचाराधीन आहे. शवदाहिणी यंत्रणा बसविल्यामुळे वृक्षांची तोड थांबण्यास मदत होणार आहे. याच बरोबर कोविड -१९ आजाराने मृत्यु पावलेल्या लोकांसाठी अंत्यविधी करतांना इतर लोकांना संसर्ग होणार नाही. त्यामुळे शवदाहिणी यंत्रणा बसविणे काळाची गरज आहे.

त्याअनुषंगाने सदर कामाचे अंदाजपत्रके व डीझाईन तयार करणे व त्यास सर्व सक्षम प्राधिकरणाच्या मंजूरी घेवून निविदा प्रक्रिया करणे व अनुषंगीक कामे पुर्ण करणेकरीता या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीस व वित्तीय मान्यता मान्यता देण्यात येत आहे.

**सुचक** :- सुधीर सुरेश काळोखे

**अनुमोदक** :- पौर्णिमा विशाल परदेशी

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब , देहू नगरपंचायत कार्यालय , देहू

**विषय क्र. ३५ :-** **शहरातील रहदारीच्या रस्त्यावर जड वाहनास बंदी करणेबाबत.**

ठराव ३५ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत हद्दीमध्ये दिवसेंदिवस लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे गावातील मुख्य रस्त्यावर माणसांची सारखी वर्दळ चालू असुन शाळेत जाणारी मुले, कामाला जाणारा कामगार वर्ग तसेच इतर अनेक कारणांनी रस्त्यांवर लोकांची वर्दळ पाहता गावातील रस्ते हे छोटे पडत आहेत. त्यातच गावालगत असणाऱ्या कारखानदारी मुळे मोठ्या अवजड वाहनाची वर्दळ गावातील रस्त्यावरूनच होत आहे. या अवजड वाहनामुळे अनेकवेळा अपघात घडलेले आहेत गावात कोणताही अनुचित प्रकार घडू नयेत याकरीता तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून जे नविन बाह्यवळण रस्ते झालेले आहेत त्या रस्तावरून अवजड वाहने नेण्यात यावीत. देहू शहरातील रहदारीच्या रस्त्यांवरून जड वाहनास बंदी घालण्यात यावी. याकरीता देहू ते देहूफाटा रोड येलवाडी या ठिकाणी जड वाहणास बंदी असलेबाबतचे फलक लावण्यात यावेत. याचबरोबर तळवडे शीव रस्ता, परंडवाल चौक या ठिकाणी सुद्धा जड वाहणास बंदी असलेबाबतचे फलक लावण्यात यावे याकामी निविदा प्रक्रिया करणेस व होणा-या खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यात येत आहे.

**सुचक** :- पुनम विशाल काळोखे

**अनुमोदक** :- पुजा सुमित काळोखे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

नगराध्यक्षा , देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ३६- शहरातील महत्वाच्या ठिकाणी आवश्यकतेनुसार हायमास्ट दिवे बसविणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ३६- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू शहरातील महत्वाच्या विविध ठिकाणी विद्युत दिवे बसविले नसल्याने त्या ठिकाणी अंधार होत असून नागरिकांना याचा नाहक त्रास होत आहे. तसेच सदर ठिकाणी चोरीचे प्रमाण देखील वाढले आहे. त्याअनुषंगाने शहरातील महत्वाच्या ठिकाणी हायमास्ट दिवे बसविणे आवश्यक आहे. याकरीता निविदा प्रक्रिया करणे व होणाऱ्या खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश बाळासाहेब परंडवाल

अनुमोदक - शितल अनिल हगवणे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय नं.३८ :स्वच्छ सर्वेक्षण आणि माझी वसुंधरा अभियान करिता Brand Ambassador नेमणूक करणेबाबत.

ठराव नं.३८ : देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून शासन आदेशानुसार देहू नगरपंचायतीमध्ये स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान २.० ला सुरुवात झालेली आहे. अभियान कालावधीमध्ये केलेल्या कामाचे मूल्यमापन त्रयस्थ कमिटीद्वारे करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर अभियानाबाबत शहरातील नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. याकरिता पर्यावरण क्षेत्राशी निगडीत सामाजिक कार्य करणाऱ्या स्थानिक पातळीवरील व्यक्तींची पर्यावरण दूत म्हणून निवड करणे जरुरीचे आहे. त्यामुळे देहू शहरातील सौ.शिल्पाताई नारायण यांचे वैद्यकीय क्षेत्रातील व महिलांच्या निगडीत असणारे कार्य उल्लेखनीय आहे. तसेच ह.भ.प.श्री.शिवाजी महाराज मोरे हे वृक्षदाई प्रतिष्ठानचे अध्यक्ष असून ते वृक्ष लागवड व संवर्धन करणेबाबत नेहमीच अग्रेसर असतात. श्री.संतोष सदाशिव हगवणे यांनी प्लास्टिक बंदी मोहिमेमध्ये सक्रीय सहभाग घेतलेला असून तत्कालीन ग्रामपंचायतीच्या काळात प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करणेकरिता मोलाचे सहकार्य केलेले आहे. त्यामुळे सौ.शिल्पाताई नारायणन, ह.भ.प.श्री.शिवाजी महाराज मोरे आणि श्री.संतोष सदाशिव हगवणे यांची स्वच्छ सर्वेक्षण व माझी वसुंधरा अभियान २.० करिता Brand Ambassador म्हणून नेमणूक करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे.

सुचक :- पौर्णिमा अभिजित मोरे

अनुमोदक :-
ज्योती गोविंद टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब ,देहू नगरपंचायत कार्यालय ,देहू

विषय क्र.३९ : रुग्णवाहिका खरेदी कार्योत्तर मान्यता देणे तसेच RTO पासिंग करून घेणे करित येणाऱ्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणे बाबत.

ठराव ३९ :- सदरचा विषय मे.सभेसमोर वाचण्यात आला त्यावर विचार विनिमय करण्यात आला. देहू ग्रामपंचायतीचे शासन आदेशानुसार ८/१२/२०२० रोजी देहू नगरपंचायातीमध्ये रुपांतर झालेले असुन नगरपंचायतीचा कार्यभार चालवण्यासाठी प्रशासकांची नियुक्ती करण्यात आली होती.जिल्हा परिषद पुणे व पंचायत समिती हवेली यांच्या कडून पत्रव्यवहार झाल्यानंतर कोरोना काळ असल्यामुळे १५ वा वित्त आयोग मधून रुग्णवाहिका खरेदी करण्यात आली होती. सध्यस्थितीत सदरची रुग्णवाहिका रुग्णसेवेसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र,देहू यांच्याकडे हस्तातरीत करण्यात आलेली आहे. सदर गाडी नगरपंचायतीच्या नावे पासिंग करणेसाठी आवश्यक कागदपत्रे एजन्सीला देण्यात आलेली असुन त्यासाठी येणाऱ्या खर्चास वित्तीय मान्यता देऊन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

सुचक :- आदित्य चिंतामण टिळेकर

अनुमोदक :- मयूर दत्तात्रय शिवशरण

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ४०- नवीन प्रशासकीय इमारत पुजा साहित्य भांडार दुकान गाळे वैकुंठ गमण मंदिर शेजारी स्तलांतरीत करणे व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता घेणेबाबत.

ठराव क्र. ४०- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून तिची स्थापना सन २०२० मध्ये करण्यात आलेली आहे. देहू नगरपंचायत स्थापना झाल्यापासून अनेक महत्वाच्या जबाबदा-या देहू नगरपंचायतीस पार पाडाव्या लागतात. देहू नगरपंचायतीकडे नवीन प्रशासकीय इमारत नसल्याने सद्यस्थितीत असलेली देहू नगरपंचायतीची जागा अपुरी पडत असून कामकाज करणेस मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत वैकुंठ मंदिराशेजारी बांधकाम करण्यात आलेल्या पुजा साहित्य भांडार दुकान गाळ्याच्या इमारतीमध्ये प्रस्तावित नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम होईपर्यंत देहू नगरपंचायतीचे कार्यालय स्थलांतरण करणे आवश्यक आहे.

देहू नगरपंचायतीचे कार्यालय उक्त ठिकाणी स्थलांतरीत करण्यासाठी कामाचे कच्चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून यामध्ये इमारतीचे डागडुजीकरण करणे, नवीन फर्निचर टाकणे व इतर अनुषंगीक कामे करणेकरीता अंदाजे २८ लक्ष इतका खर्च लागणार आहे. त्यामुळे सदर कामाचे अंदाजपत्रके तयार करणे, त्यास सक्षम प्राधिकरण यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेवून सदर कामाची निविदा प्रक्रिया करणेस व याकामी होणा-या खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - योगेश हनुमंत काळोखे

अनुमोदक - योगेश बाळासाहेब परंडवाळ

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ४१- देहू नगरपंचायतीकरीता अग्निशमन वाहन खरेदी करणे प्रक्रियेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत.

ठराव क्र. ४१- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवनिर्मित नगरपंचायत असून तिची स्थापना सन २०२० मध्ये करण्यात आलेली आहे. देहू नगरपंचायतीकडे अग्निशमन वाहन नसल्याने आपत्कालीन परिस्थतीमध्ये आग विझविण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील अग्निशमन वाहन बोलविण्यात येत असते. त्यामुळे आग विझविण्यास मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत असून आग विझविण्यास विलंब होतो. देहू हे तीर्थक्षेत्र असल्याने देहू शहरामध्ये तुकाराम बिज, कार्तिकी यात्रा व आषाढी यात्रा यादरम्यान महाराष्ट्रातून लाखोच्या संख्येने भाविक भक्त देहू शहरात दाखल होत असतात. त्यामुळे भाविकांच्या सुरक्षिततेच्या सोयी सुविधा तात्काळ उपलब्ध करुन देणे हे देहू नगरपंचातीची महत्वाची जबाबदारी असते. त्यामुळे अशा मोठ्या यात्रेच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडल्यास देहू नगरपंचायतीकडे अग्निशमन वाहन उपलब्ध असने अत्यावश्यक आहे.

देहू नगरपंचायतीच्या नवीन प्रशासकीय इमारत परिसरामध्ये अग्निशमण केंद्र स्थापण करण्याचे प्रस्तावित असून सदर कामाच्या अंदाजपत्रकामध्ये तशी तरतुद करण्यात येणार आहे. याच बरोबर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन रक्षक उपाययोजना मधील सर्व तरतुदींची व नियमांची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर अग्निशमन वाहनाकरीता देहू नगरपंचायत स्वहिस्सा भरण्यास तयार असून शासन निधी व्यतिरीक्त लागणारी रक्कम ही नगरपंचायत भरण्यास तयार आहे. याच बरोबर अग्निशमन वाहनासाठी पुरेसा अधिकारी / कर्मचारी वर्गाकरीता येणारा खर्च देहू नगरपंचायत स्वनिधीतून करणेस तयार आहे.

अग्निशमन वाहनाची निकड पाहता अग्निशमन वाहन मिळणेसाठी सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन शासनास वाहन मिळणेसाठी / खरेदीसाठी प्रस्ताव सादर करणेस व अनुषंगीक कामे करणेस या ठरावान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - रसिका स्वप्निल काळोखे

अनुमोदक - आदित्य चिंतामण टिळेकर

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे . . .

विषय क्र. ४२ :- महाराष्ट्र राज्य सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत देहू नगरपंचायत, देहू साठी नवीन पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास शासनाची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेणेबाबत तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत.

ठराव क्र. ४२ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना अंतर्गत देहू शहराला पिण्याचा पाण्याचा पुरवठा करणेसाठी शासनास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यासाठीचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तत्पुर्वी देहू नगरपंचायत नवीन पाणी पुरवठा योजनेकरिता सविस्तर तांत्रिक अंदाजपत्रक तयार करणे आवश्यक आहे. सदर कामाकरीता नगरपंचायतीकडे तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. याअनुषंगाने देहू नगरपंचायत नवीन पाणी पुरवठा योजनेकरिता सविस्तर तांत्रिक अंदाजपत्रक तयार करणे, त्यास तांत्रिक मंजूरी आणणे व शासनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेसाठी सविस्तर प्रस्ताव तयार करणे कामासाठी ई- निविदा प्रक्रिया करुन तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेकामी या ठरावान्वये सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रविण रामदास काळोखे

अनुमोदक - सुधिर सुरेश काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे . . .

**विषय क्र. ४३ :- महाराष्ट्र राज्य सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत देहू नगरपंचायत, देहू साठी नवीन पाणी पुरवठा योजनेव्दारे काम करुन त्यास शासनाची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेणेबाबत.**

ठराव क्र. ४३ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान योजना अंतर्गत देहू शहराला पिण्याचा पाण्याचा पुरवठा करणेसाठी जुने पाणी पुरवठा केंद्र अस्तित्वात आहे. देहू हे तीर्थक्षेत्र असल्याने देहू शहरात आषाढी व कार्तिकी यात्रा भरत असतात. यात्रा कालावधी दरम्यान देहू शहरात येणा-या भाविकांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. दर महिन्याच्या गुरुवार, रविवार, लग्न सोहळा कार्यक्रम व इतर महत्वाच्या दिवशी अनेक नागरिक हे देहू शहरामध्ये येत असतात. त्यामुळे शहराची दैनंदिन तरंगती लोकसंख्या पाहता सद्यस्थितीत अस्तित्वात असलेली पाणी पुरवठा योजना अपुरी पडत आहे.

देहू शहरात वाढत्या लोकसंख्येचे प्रमाण पाहता तसेच पुढील ३० वर्षात देहू शहराची होणारी हद्दवाढ अस्तीत्वात असलेली पाणी पुरवठा योजना तुटपुंजी / अपुरी पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. देहू शहराचा पुढील ३० वर्षाचा संभाव्य विचार करुन देहू शहराकरीता नवीन पाणी पुरवठा योजनेचा नवीन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन आवश्यक त्या परिपूर्तीसह प्रस्ताव शासनाच्या प्रशासकीय मान्यतेस्तव व निधी उपलब्धतेसाठी सादर करण्यात यावा. त्यास या ठरावान्वये सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक - मिना राहुल कुऱ्हाडे

अनुमोदक - स्वप्ना जयेश मोरे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा, देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ४४- उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे पत्रावर देहू तीर्थक्षेत्र विकास आराखडयातील भुयारी गटार योजना हस्तांतरित करणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

ठराव क्र. ४४- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत कार्यक्षेत्रात तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत भुयारी गटार योजनेची कामे पुर्ण करण्यात आली होती. सदर भुयारी गटारीचे कामे करतांना संबंधित कंत्राटदारामार्फत काही तांत्रिक अडचणी पुर्ण केल्या नसल्याने मलनिस्सारण वाहिन्या व चेंबर्स तुंबल्याच्या विविध तक्रारी देहू नगरपंचायत कार्यालयाकडे प्राप्त झाल्या होत्या. मा. जिल्हाधिकारी सो, पुणे व मा. आमदार साहेब, मावळ विधानसभा मतदारसंघ यांनी दिनांक २४/११/२०२१ रोजी देहू नगरपंचायत हद्दीतील भुयारी गटार लाईनची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करण्यात आली होती. भेटी दरम्यान देहू नगरपंचायतीस सदर गटार लाईन देखभाल दुरुस्ती करतांना येणाऱ्या अडचणींबाबत तसेच मलनिस्सारण वाहिन्या व चेंबर्स वारंवार तुंबत असलेबाबतची बाब मा. जिल्हाधिकारी सो, पुणे व मा. आमदार साहेब, मावळ विधानसभा मतदारसंघ यांचे निदर्शनास आणून दिली होती.

त्याअनुषंगाने उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र. ३, पुणे -२ यांनी त्यांचेकडील दिनांक ०१/१२/२०२१ व दिनांक २०/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये देहू शहरातील मलनिस्सारण वाहिन्या व चेंबर्स वारंवार तुंबत असलेबाबतची ठिकाणे कळविण्याबाबत पत्र दिले होते. त्यानुसार देहू नगरपंचायतीकडील दिनांक २७/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये मलनिस्सारण वाहिन्या व चेंबर्स वारंवार तुंबत असलेबाबतची तक्रारी पत्रे व ठिकाणे यादीसह उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र. ३, पुणे -२ यांना देण्यात आलेली होती.

उपविभागीय अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र. ३, पुणे -२ यांनी त्यांचेकडील दिनांक १६/०२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारींचे निवारण करण्यात आल्याचे कळविले असून भुयारी गटार योजना हस्तांतरित करीत असलेबाबतची हस्तांतरण टिपणी सादर केली आहे. परंतू देहू नगरपंचायतीमार्फत सदर तक्रारीचे अनुषंगाने कामाची पाहणी केला असता, काही ठिकाणी तक्रारीनुसार काम पुर्ण केल्याचे दिसून आलेले नाही. त्यामुळे सदर भुयारी गटार योजनेचे हस्तांतरण करणेपुर्वी सदरची अपुर्ण कामे पुर्ण करणे आवश्यक आहे व तदनंतरच हस्तांतरण करणेची प्रक्रिया पुर्ण करण्यात यावी. तसेच सदर भुयारी गटार योजनेचे काम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र घेण्यात यावे असे या ठरावान्वये सर्वानुमते मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक - पूनम विशाल काळोखे

अनुमोदक - रोहन अनिल ढवळे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

**मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

विषय क्र. ४५- आरोग्य विभागामार्फत कचरा संकलन करणे व इतर कामांसाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांकरीता डिझेल / पेट्रोल खरेदी करणेबाबत.

ठराव क्र. ४५- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत कार्यालयाकडे आरोग्य विभागाअंतर्गत शहरातील दैनंदिन निर्माण होणारा कचरा अस्तित्वात असलेल्या घंटागाडया व ट्रॅक्टर इत्यादी वाहनाव्दारे घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पापर्यंत वाहतूक केला जातो. त्यामुळे देहू नगरपंचायतीच्या मालकी असलेल्या वाहनाकरीता डिझेल / पेट्रोल खरेदी करणे ही आवश्यक बाब आहे. त्याअनुषंगाने नगरपंचायत हद्दीतील संत तुकाराम पेट्रोलीयम यांना डिझेल / पेट्रोल खरेदी करिता प्राधिकृत करण्यात यावे. याकामी होणाऱ्या खर्चास या ठरावान्वये सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देण्यात येत आहे.

सुचक - पौर्णिमा विशाल परदेशी

अनुमोदक - पुजा अमोल डिवटे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत

सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

**मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू**

विषय क्र. ४६- देहू नगरपंचायत हद्दीमध्ये संपुर्ण पाणी वितरण व्यवस्था शुद्धीकरण, देखभाल दुरुस्ती व साहित्यासह निविदा प्रक्रिया करणे.

ठराव क्र. ४६- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायतीचे पाणी पुरवठा जलशुद्धीकरण केंद्राचे काम हे तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत करण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत पाणी पुरवठा जलशुद्धीकरण केंद्रावरील काही साहित्याची देखभाल व दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे शहरात पाणी वितरण करतांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याअनुषंगाने संपुर्ण पाणी वितरण व्यवस्था शुद्धीकरण करणे, रसायन साहित्य व मनुष्यबळासह देखभाल दुरुस्तीची कामे करणेकरीता जलशुद्धीकरण केंद्र मासिक तत्वावर चालविणेकामी निविदा प्रक्रिया करुन सदरची कामे पुर्ण करणेसाठी या ठरावान्वये सर्वानुमते प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - ज्योती गोविंद टिळेकर

अनुमोदक - रसिका स्वप्नील काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

मेहेरबान मा. अध्यक्षसाहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

यांजकडे ...

विषय क्र. ४७ :- **महाराष्ट्र राज्य सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत देहू नगरपंचायत, देहू साठी नवीन पाणी पुरवठा योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन त्यास शासनाची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेणेबाबत तांत्रिक सल्लागार नेमणेबाबत.**

ठराव क्र. ४७ :- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू नगरपंचायत ही नवीन नगरपंचायत असून नगरपंचायतीची स्थापना सन २०२० मध्ये झालेली आहे. देहू नगरपंचातीकरिता नवीन प्रशासकीय इमारत व अग्निशमण केंद्राकरिता शासनास प्रशासकीय व तांत्रिक मान्यता घेण्यासाठीचा प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आलेला आहे. तत्पुर्वी देहू नगरपंचायत नवीन प्रशासकीय इमारतीकरीता व अग्निशमण केंद्र इमारत बांधकामाचे सविस्तर तांत्रिक अंदाजपत्रके व इमारतीचे रेखांकन नकाशे तयार करणे आवश्यक आहे. याकामी नगरपंचायतीकडे आर्किटेक्चर व तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने ई- निविदा प्रक्रिया करुन आर्किटेक्चर व तांत्रिक सल्लागाराची नेमणूक करणेकामी या ठरावान्वये सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - शितल अनिल हगवणे

अनुमोदक - पुनम विशाल काळोखे

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner

स्थापना सन २०२०

# मेहरबान मा. अध्यक्षा साहेब, देहू नगरपंचायत कार्यालय, देहू

विषय क्र. ४८- देहू नगरपंचायत हद्दीमध्ये मांस-मच्छी विक्री करण्यास व इंद्रायणी नदीपात्रात मासे पकडण्यास बंदी घालणेबाबत.

ठराव क्र. ४८- सदरचा विषय मे. सभेसमोर वाचण्यात आला त्यावर चर्चा विनिमय करण्यात आला. देहू हे शहर जगद्गुरु संत श्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या वास्तव्याने पावन झालेले शहर आहे. देहू शहरास धार्मिक व पौराणिक महत्त्व प्राप्त आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून भाविक भक्त श्रद्धेने श्री तुकाराम महाराज यांचे दर्शनाकरीता देहू शहरात येत असतात. देहू शहरात अनेक ठिकाणी मांस विक्रीचे दुकाने सुरु असल्यामुळे येणाऱ्या भाविक भक्तांच्या भावना दुखावू नयेत याकरीता देहू शहराच्या हद्दीत मांस-मच्छी विक्री करणेस पुर्णपणे बंदी घालणे आवश्यक आहे. देहू शहरातून इंद्रायणी नदीचे पात्र वाहत असून या ठिकाणी काही नागरिक अवैध्यपणे मासेमारी करीत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे इंद्रायणी नदीत होणारी अवैद्ध मासेमारी पुर्णपणे बंदी करण्यात यावी. तथापि देहू शहरात अवैध्यपणे मांस-मच्छी विक्री करतांना आढळल्यास व इंद्रायणी नदीत मासेमारी करतांना आढळल्यास दंडात्मक कारवाई अथवा फौजदारी स्वरुपाची कारवाई करणेकामी या ठरावान्वये सर्वानुमते मान्यता देण्यात येत आहे.

सुचक - प्रियंका अभिजित मोरे

अनुमोदक - स्वप्ना योगेश मोरे.

ठराव सर्वानुमते मंजूर

नगराध्यक्षा ,देहू नगरपंचायत
सर्वसाधारण सभा दिनांक २५/०२/२०२२

Scanned with OKEN Scanner